
# सुगंधा

नोंद १९५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. नं.



REFBK-0008735

૧૩૫૮

४४९६
११०४
९३५८
२८/४/४४

दा. क्र. ८८३४

REFBK-0008735

# सुगंधा

पंचवीस निवडक कवितांचा संग्रह

किंमत दीड रुपया

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
२२ कसबा, पुणें २

• • •

सर्व हक्क सुरक्षित

• • •

चित्र
दीनानाथ दलाल

• • •

साहित्यपरिषदेचें
शुद्धलेखन वापरलें आहे.

• • •

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस लि.,
३८३ नारायण, पुणें २

• • •

नं. दि.

# पुस्तकासंबंधी

मराठी साहित्यांतील काव्याच्या सुगंधित उद्यानांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व सर्वसामान्य वाचकांसाठी प्रस्तुत काव्यसंग्रह तयार करण्यांत आला आहे. या संग्रहाला कांही मर्यादा आहेत याची जाणीव संपादकांना असल्यामुळे, मराठींतील सर्वच कवींच्या प्रातिनिधिक कविता यांत अंतर्भूत करणें शक्य होत नाहीं. त्याचप्रमाणें मराठी कवितेचा सविस्तर इतिहासहि येथे दाखविला जाणें शक्य होत नाही, किंबहुना तसा प्रयत्न केल्यास तो प्रयत्न काव्यप्रवेश करूं इच्छिणाऱ्या वाचकांना थोडासा अवजडच वाटेल. काव्याचा समग्र इतिहास, त्यांतील विविध वळणें व प्रणाली यांचा अभ्यास रसिकतेने काव्यवाहिनींत भरपूर अवगाहन केल्या-वरच, व्हावयास पाहिजे. साहित्य-प्राज्ञ वा विशारद या परीक्षांसाठी किंवा कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी व प्रौढ रसिकांसाठी तो प्रयत्न केला जावा. हा काव्यसंग्रह केवळ शालेय विद्यार्थी व सर्वसामान्य वाचक यांच्यासाठीच तयार केलेला आहे ही मर्यादा पाळूनच या संग्रहाच्या प्रस्तावनेची बैठक सजविलेली आहे.

आजकालच्या विद्यार्थ्यांना व सर्वसामान्य मराठी वाचकांना कवितेबद्दल गोडी नसावी हा अनुभव खेदकारक वाटतो. कोणत्याहि ग्रंथालयांत 'कथा–कादंबरी–नाटक' यांची आवक-जावक ज्या प्रमाणांत होते, त्याच्या

एकदशांश प्रमाणांतहि कवितांच्या पुस्तकांची देवाण-घेवाण होत नाही असे कटु पण व्यावहारिक सत्य आहे. या उदासीनतेचीं कारणें पाहून तीं नाहीशी करण्याचा प्रयत्न होणें अगत्याचें आहे.

आजच्या विद्यार्थ्यांना काव्याबद्दल विचारा—म्हणजे ते चटकन तुम्हांला सांगतील की काव्य हा फक्त एक अभ्यासाचा विषय आहे, आणि संतकाव्य हा भक्तिमार्गांत प्रवेश करण्याचा विषय आहे. ही संकुचित व चुकीची कल्पना या विद्यार्थ्यांचीच आहे असें नाही; विद्यापीठांतील कांही शिक्षण-तज्ज्ञहि 'सायन्स' शाखेसाठी पुस्तकें नेमलीं जातांना तीं कवितांचीं नसावींत असें आग्रहाने सांगत असतांना आढळून येतील. या सर्व चौकशीचा अर्थच हा की काव्य हा सौंदर्याचा व आनंदाचा विषय आहे; आणि त्याचा संबंध मनुष्यमात्राच्या जीवनाशी असतो ही जाणीव अद्याप निर्माण झालेली नाही. काव्याचा विषय, काव्याची भाषा, काव्याची रचना, काव्यांतील रसवत्ता आणि कवीचा दृष्टिकोन यांच्याकडे बघण्याचा चष्मा आता समाजाने बदलला पाहिजे. केवळ शब्दार्थासाठी, उपदेशासाठी अथवा तत्त्वज्ञानासाठीं काव्य लिहिलें जात नाही आणि जाऊंहि नये.—त्याचप्रमाणें तें वाचलेंहि जाऊं नये. हे सर्व गौण उद्देश आहेत. जीवनांतील सौंदर्य दिसावें आणि त्या सौंदर्यदर्शनाने सर्वांना आनंद व्हावा ही कवीच्या काव्यनिर्मितीची आणि रसिकांच्या काव्यवाचनाची भूमिका असावी असा आमचा आग्रह आहे.

काव्याविषयी आवड निर्माण होण्यासाठी प्रथम वाचकांपुढे प्रासादिक, रसाळ, अर्थपूर्ण व नादमधुर कवितांचीं उदाहरणें ठेवायला हवींत; आणि त्या उदाहरणांनी त्यांच्या मनाला आनंद दिला, त्यांतील सुंदर शब्दचित्रें त्यांच्या नजरेसमोर उभीं राहिलीं, त्यांतील भावगंधाने त्यांचीं मनें मोहरून गेलीं आणि त्यांतील नादमधुर ओळींनी त्यांच्या श्रुतींवर परिणाम केला म्हणजे त्या कविता आपोआपच त्यांच्या मुखांतून गुणगुणल्या जातील. अधिक कविता वाचण्याची हौस त्यांच्या मनांत उत्पन्न होईल व या हौसेपोटीं कवितेचा अभ्यास करण्याची वृत्ति तयार होईल. हा शैक्षणिक हेतु लक्षांत ठेवून प्रस्तुत संग्रहांतील कवितांची निवड केलेली आहे.

मराठी कवितेला फार प्राचीन व रमणीय परंपरा आहे. बाराव्या शतकापासून मराठी कवितेने लोकरंजन व लोकशिक्षण केलेलें आहे. महानुभाव पंथांतील-महेंद्रभट्ट, नरेंद्रपंडित, भास्करभट्ट बोरीकर इत्यादि थोर कवींची आख्यानक कविता आजहि त्यांतील रसोत्कटतने व कल्पना-विलासाने हृदयंगम वाटते. वारकरी संप्रदायांतील अध्वर्यु ज्ञानेश्वर-यांनी तेराव्या शतकांतच तात्त्विक विचारांना काव्याचा मोहक साजशृंगार चढविला होता. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरींतील निवडलेला प्रस्तुत संग्रहांतील उतारा दोन दृष्टींनी महत्त्वाचा ठरेल. त्यांत शुद्ध भक्तीचें जसें माहात्म्य आहे तसें वर्णाश्रमादि कल्पनेच्चें तौलनिक वैय्यर्थ्य आहे. त्याचप्रमाणे प्रासादिक भाषाशैली व मार्मिक दृष्टान्त यांचाहि परिचय होईल. ज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञान व काव्य यांचा मिलाफ घडवून आणण्याची भूमिका येथे विद्यार्थ्यांना सहजच कळेल. ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई ही तर प्राचीन कवियित्रींपैकीच एक; पण तिच्या बालसुलभ भावनेंतूनहि केवढा विचार वहात आहे तें ' ताटीच्या अभंगांतून ' सहजच प्रत्ययास येईल.

नामदेव व तुकाराम यांचे अभंग आज अनेक शतकें होऊन गेलीं पण अभंगच राहिले आहेत. ' लोकांची अभिरुचि व काळाची चाळणी ' यांतून टिकाव धरून राहिलेलें हें अक्षर साहित्य आहे. या संतांची भाषा ही साधी-सुधी मराठमोळी भाषा आहे. पढीक शिक्षण नसलेल्या पण बहुजन-समाजाचे प्रतिनिधि असलेल्या या कवींच्या अभंगांतून विशुद्ध भक्तीचें व साधुपुरुषांबद्दल वाटणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या आदराचें दर्शन आपल्याला होतें. हे कवि म्हणजे समाजाचे शिक्षकच आहेत. मराठींत अध्यात्मिक व उपदेशपर काव्य जें लिहिलें गेलें त्याच्या मागे या सर्व संतांच्या कर्तृत्वाची आणि कळवळ्याची पार्श्वभूमि आहे; चारित्र्यसिद्धीची प्रभावळ आहे आणि समाजजीवनाचें अंतर्मुख होऊन केलेलें निरीक्षण आहे.

पण या अध्यामिक व उपदेशपर काव्यांतच सर्व जुनें मराठी काव्य लुप्त झालेलें नाही. मनुष्याच्या सर्वसामान्य भावनांना रिझवूं शकेल असें आख्यानक काव्याचें एक भव्य दालन प्राचीन कवींनी उघडलेलें आहे. महानुभाव

पंथांतील महेंद्रभट्टाचें श्रीकृष्णचरित्र, दामोदर पंडिताचें वच्छहरण, नरेंद्र-पंडिताचें रुक्मिणी स्वयंवर किंवा भास्करभट्ट बोरीकराचें शिशुपालवध–ही प्रदीर्घ आख्यानक कविता क्षणभर दूर ठेवली तरी एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, श्रीधर आणि मोरोपंत या आख्यानक कवींना कोणीहि विसरणार नाही. भारत, भागवत व रामायण यांतील कथाभाग अनेक लहानथोर कवींना स्फूर्तिदायक ठरलेले आहेत: त्यांची ओळख व्हावी म्हणून सर्वच शक्य नसले तरी मुक्तेश्वर, सामराज आणि मोरोपंत या कवींचे कांही उतारे प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट केलेले आहेत.

परंतु संतकवि काय किंवा पंतकवि काय, यांच्या कवितेंत सर्वसाधारण माणसांचीं लौकिक सुखदुःखें उतरलेलीं नाहीत, भक्तीशिवाय अन्य कोणतीहि वैयक्तिक कविभावना त्यात फुललेली नाही. स्वातंत्र्याच्या कालखंडांत-म्हणजे शिवाजी महाराजांपासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत—रामजोशी, होनाजी, प्रभाकर इत्यादि शाहिरांनी कवितेला सामान्य लोकजीवनांत समाविष्ट करून घेतली खरी; आणि सर्वसामान्य लोकांची मनोभावना रंगविली खरी पण तिचें कौतुक शिष्टांनी त्या वेळीं केलें नव्हतें आणि आजहि तें खुलेपणाने केले जात नाही. वास्तविक जनता-सन्मुख काव्याची ही बैठक, या स्वातंत्र्योत्तर नव्या जमान्यांत, आपण पूर्वग्रहविरहित दृष्टीने आणि रसिकतेच्या जिव्हाळ्यानें, तपासून स्वीकृत करावयास पाहिजे.

इंग्रजी राजवटीमुळे राजकीय पारतंत्र्य आपणांस प्राप्त झालें हें खरें—पण पाश्चात्य जीवनाचा जवळून परिचय होऊन जुने संकेत व जुनें जीवन तपासून, नवे संकेत व नवें जीवन निर्माण करण्याची एक संधि महाराष्ट्राला तिच्यामुळे मिळाली असें म्हटलें तर तें विधान आक्षेपार्ह ठरूं नये. एकोणविसाव्या शतकांतील बराचसा काळ भाषांतराच्या आणि अनुकरणाच्या पांगुळगाड्याने आपण वाटचालीस घेतला हें खरें; पण चिपळूणकर युगानंतर नव्या स्वतंत्र जीवनाचीं स्वप्नें आमच्या राजकीय पुढाऱ्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना आणि प्रतिभावंत कवींना पडूं लागलीं. लो. टिळकांची स्वातंत्र्याबद्दलची भक्ति आणि आगरकरांचा सुधारणावाद लोकांचीं मनें आकर्षण करूं लागला. श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर यांच्या

नाटकांतून किंवा हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून जसे नवे विचार प्रस्फुरण पावूं लागले तसेच ते नवे विचार केशवसुतांच्या कवितेंतूनहि व्यक्त होऊं लागले. केशवसुतांपासून कवींचा एक नवा संप्रदाय निर्माण झाला. इंग्रजी काव्यवाचनाने पायाभरणी झाली, नव्या तंत्राने रचना स्पष्ट झाली, पण त्यांतील रसवत्तेसाठी आमच्याच विचार व विकारांचें स्वतंत्र साह्य घ्यावें लागलें. भावगीतें गुणगुणलीं गेलीं, आत्मनिष्ठ कविता लोकप्रिय झाली; कौटुंबिक अनुभूतीपासून ते थेट राष्ट्रीय व मानवी व्यापक अनुभूतींपर्यंत आविष्कारास अवसर मिळाला. काव्याच्या अंतरंगाप्रमाणेच बहिरंगाचा वेश बदलला; जुनीं अक्षरवृत्तें मागे पडूं लागलीं; मात्रावृत्तें, छंद यांची आवड वाढूं लागली व आज तर विचार सहजतेने सांगण्यासाठीं मुक्तछंदाचा अंगीकार करण्याकडे कवींची दृष्टि वळली.

कवींबरोबर कवयित्रीहि पुढे सरकल्या व मराठी काव्याचा हा मनोहर बगीचा नाना सुगंधी व रंगीबेरंगी पुष्पांनी बहरून गेला. केशवसुतांच्या कवितेंत बंडखोर वृत्ति दाखविणाऱ्या पंक्तींपैकी 'देवदानवा नरें निर्मिलें हें मत लोका कळवूं या' या चरणापुढे अनंत काणेकर जातात आणि त्यांच्या 'दोन देवभक्तांपैकी' एक देवाला 'गिरणीच्या धुराड्यामध्ये' फेकून देण्याची प्रतिज्ञा करतो असें सांगतात. केशवसुतांच्या तुतारींतील ओजस्वी-पणाने जागृत होऊन समाजपुरुष कुसुमाग्रजांच्या मुखाने 'क्रांतीचा जय-जयकार' करून भारताच्या स्वातंत्र्याचीं स्तोत्रें गाऊं लागला आहे. अनिल आणि कुसुमाग्रज मानवतेचीं दिव्य रूपें वर्णन करीत आहेत; 'बी' कवींच्या तत्त्वचिंतनपरतेपासून, सौहार्दाने नटलेल्या तांबे यांच्या कौटुंबिक भावगीतांपर्यंत सर्व जीवनदृश्यें मराठी कवितेंत दिसून येत आहेत.

मनुष्याच्या उदात्त भावना व विचार कवि हा आकर्षक भाषेंत व नादमधुर पद्धतीने प्रकट करूं लागला कीं काव्यकलेची निर्मिति होते हें साहित्यांतील सूत्र सदोदित समोर ठेवूनच या संग्रहांत कवितांची निवड करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कवितांचा अभ्यास एका विशिष्ट पद्धतीनें व्हावा असें धोरण आहे. कवितेच्या आरंभीं विषयाचा परिचय केवळ आवश्यक तितकाच, म्हणून त्रोटक ठेवला आहे; कारण वाचकाचें लक्ष

मुख्यत्वे कवितेवरच केंद्रित व्हावयास हवें. कविता ही एकदाच नव्हे तर अनेक वेळां वाचावी म्हणजे त्यांतील शब्द व अर्थ यांचें नवें रहस्य उत्तरोत्तर अनुभवास येत जाईल. या रहस्याच्या आकलनास उपयुक्त ठरण्यासाठी कवितेच्या शेवटीं टीपा व प्रश्न जोडलेले आहेत. या टीपांतील संदर्भ व अपरिचित शब्दांचे अर्थ जसे उपयुक्त ठरतील तसेच विचारलेले प्रश्न, कवितेकडे वाचकांना अंतर्मुख होऊन बघण्यास प्रेरक ठरतील. कवितांची मांडणी करतांना शक्य तों कालानुक्रम राखण्याची दक्षता बाळगिली आहे.

केवळ पंचवीस कवितांच्या या संग्रहाने मराठी कवितेचें सामग्र्यानें दर्शन होईल असें बिलकुल नाही : किंवा यांत निवडलेले सर्व कवि सोड-ल्यास, इतर कवि तुलनेने कमी ठरणारे आहेत असेंहि नाही : त्यांच्या कवितांचाहि असा एक संग्रह निघूं शकेलच. फार काय, भास्करभट्ट बोरीकर, नरेंद्रपंडित यांच्यासारखे प्राचीन आख्यानक कवि, एकनाथ व रामदास यांच्यासारखे संतकवि, रामजोशी व होनाजी यांच्यासारखे शाहीर, विनायक व माधव यांच्यासारखे ऐतिहासिक काव्य निर्माण करणारे ओजस्वी कवि, तांबे यांच्यासारखा सुंदर संसारचित्रें रेखाटन करणारा भावकवि हे या संग्रहांत आढळणार नाहींत ही उणीव प्रस्तुत संग्रहांत भासलेली आहेच : तथापि ‘ कालच्या काव्याबद्दल स्नेहादर व आजच्या काव्याबद्दल प्रेम ’ नव्या पिढींत निर्माण करण्याचा उद्देश मर्यादित कवितांच्या निवडींत ठेवला गेल्यामुळे, सर्वांच्या कवितांची येथे निवड झालेली नाही. त्यांतहि प्राचीन कवींपेक्षा अधिक अवसर नवीन कवींना दिला आहे असाहि सूर एकादा आक्षेपक घेऊं शकेल. परंतु हा पक्षपात जाणून बुजून करण्यामागे, आजच्या कवितेबद्दल ओढ निर्माण करण्याची भूमिका संपादकांनी स्पष्टपणें घेतलेली आहे. मात्र इतकेंच या प्रसंगीं म्हणतां येईल कीं हा पक्षपात सार्थ ठरावा इतका प्रतिभेचा मनोज्ञ विलास आजच्या कवींनी दाखविलेला आहे खास.

—मराठी साहित्यांतील काव्यवाटिकेंत प्रवेश करणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांना व वाचकांना ही ‘ सुगंधा ’ संतुष्ट करील अशी अपेक्षा आहे.

● ● ●

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | भक्तींतील अभेदता | ज्ञानेश्वर |
| २ | ताटीचे अभंग | मुक्ताबाई |
| ३ | अभंगाष्टक | नामदेव–तुकाराम |
| ४ | किरातार्जुनयुद्ध | मुक्तेश्वर |
| ५ | रुक्मिणसि उपदेश - | सामराज |
| ६ | कर्णशल्यसंवाद | मोरोपंत |
| ७ | सतारीचे बोल | केशवसुत |
| ८ | ब्राह्मण किंवा महार | ना. वा. टिळक |
| ९ | विरामचिह्नें | गोविंदाग्रज |
| १० | तृणपुष्प | बालकवि |
| ११ | रातराणीच्या मृदु फुलांनों | गिरीश |
| १२ | दोन विभूति | माधव ज्यूलियन |
| १३ | सरितेचें चरित्र | यशवंत |
| १४ | कवींचीं विरामचिह्नें | केशवकुमार |
| १५ | जीवनानंद | अनिल |
| १६ | दोन देवभक्त | अनंत काणेकर |
| १७ | आला आषाढ-श्रावण | बा. सी. मर्ढेकर |
| १८ | आमचें निशाण | बा. भ. बोरकर |
| १९ | मानव | कुसुमाग्रज |
| २० | माझा सुधीर | पद्मा गोळे |
| २१ | चिमुकलें डबकें | इंदिरा सन्त |
| २२ | वर्षा | कृ. ब. निकुंब |
| २३ | अहा ते सुंदर दिन हरपले ! | शान्ता शेळके |
| २४ | शतकानंतर | वसन्त बापट |
| २५ | हात हवें मज | मंगेश पाडगांवकर |

# १. भक्तींतील अभेदता

ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 6034
नों. दि.

[ विषय-परिचय : ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर केलेलें विवेचन म्हणजे 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ होय. तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा इतका अपूर्व संगम अन्यत्र क्वचित्च आढळतो. ज्ञानेश्वर हे भक्तिमार्गाचे उपासक होते. मनुष्य कोणत्याहि कुळांतील अथवा जातींतील असो, त्याने विशुद्ध भक्ति दाखविली तर परमेश्वर प्रसन्न होतो, हा विचार अत्यंत रसाळ भाषेंत व मार्मिक दृष्टान्तांनी कसा पटवून दिला आहे हें वाचा. ]

म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाती अंत्यजही व्हावें ।
वरि देहाचेनि नांवें । पशूचें ही लाभो ।। १ ।।
पाहे पां सावजें हातिरु धरिलें । तेणें तया काकुळती मातें स्मरिलें ।
कीं तयाचें पशुत्व वावो जाहालें । पावलिया मातें ।। २ ।।
अगा नांवें घेतां वोखटीं । जे आघवेया अधमांचिये सेवटीं ।
तिये पापयोनी ही किरीटी । जन्मले जे ।। ३ ।।
ते पापायोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड ।
परि माझ्या ठायीं दृढ । सर्वभावें ।। ४ ।।
जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टि भोगी माझेंचि रूप ।
जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ।। ५ ।।

माझिया कीर्तीविण। जयांचे रिते नाहीं श्रवण।
जया सर्वांगीं भूषण। माझी सेवा ॥ ६ ॥
जयांचें ज्ञान विषो नेणे। जाणीव मज एकातेंचि जाणे।
जयां ऐसें लाभे तरी जिणें। येऱ्हवी मरण ॥ ७ ॥
ऐसा आघवांचिपरी पांडवा। जिहीं आपुल्या सर्वभावा।
जियावयालागीं वोलावा। मींचि केला ॥ ८ ॥
ते पापयोनीही होतु कां। ते श्रुताधीतही न होतु कां
परि मजसी तुकितां तुका। तुटी नाहीं ॥ ९ ॥
पाहें पां भक्तीचेंनि आथिलेपणें। दैत्यीं देवां आणिलें उणें।
माझें नृसिंहत्व लेणें। जयेचिये महिमे ॥ १० ॥
तो प्रल्हादु गा मजसाठीं। घेतां बहु तें सदा किरीटी।
कां जें मियां द्यावें ते गोष्टी। तयाचिया जोडे ॥ ११ ॥
एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परि इंद्रही सरी न लाहे उपरें।
म्हणोनि भक्ति गा एथ सरे। जाति अप्रमाण ॥ १२ ॥
राजाज्ञेचीं अक्षरें आहातीं। तियें चामा एका जया पडतीं।
तया चामासाठीं जोडती। सकळ वस्तु ॥ १३ ॥

वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे। एथ राजाज्ञाची समर्थ आहे।
तेंचि चाम एक जैं लाहे। तेणें विकतीं आघवीं ।। १४ ।।
तैसें उत्तमत्व तैंचि तरे। तैंचि सर्वज्ञता सरे।
जै मनोबुद्धि भरे। माझेंनि प्रेमें ।। १५ ।।
म्हणोनि कुळ जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण।
एथ अर्जुना माझेंपण। सार्थक एक ।। १६ ।।
तेंचि भलतेणें भावें। मन मज आंतु येतें होआवें।
आलें तरी आघवें। मागील वावो ।। १७ ।।
जैसें तंवचि वहाळवोहळ। जंव न पवती गंगाजळ।
मग होऊनी ठाकती केवळ। गंगारूप ।। १८ ।।
कां खैर चंदनकाष्ठें। हे विवंचना तंवचि घटे।
जंव न घापती एकवटें। अग्निमाजीं ।। १९ ।।
तैसें क्षत्री वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यजादि इया।
जाती तंवचि वेगळालिया। जंव न पवती मातें ।। २० ।।

—ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरी अध्याय नववा
ओंव्या ४४१ ते ४६०.

**टीपा :—**

'सावजें हातिरुं धरिलें' नक्राने हत्तीस पकडलें तेव्हा हत्तीने परमेश्वराची प्रार्थना केली व देव प्रसन्न होऊन हत्तीची सुटका झाली ही गजेंद्रमोक्षाची कथा येथे अभिप्रेत आहे. 'जियावयालागीं वोलावा मींचि केला' = जगण्यासाठी मीच जीवन केला गेलों. 'श्रुताधीतही न होतु कां 'ऐकून व शिकून विद्वान् झालेले नसेनात का ? 'आथिलेपणें '=संपन्नतेने. 'माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमें ॥ ' = ज्याच्या मोठेपणासाठीमला नृसिंहरूप अलंकार धारण करावा लागला. प्रल्हाद हा हिरण्यकश्यपूचा मुलगा. हा मोठा भगवद्भक्त होता. हिरण्यकश्यपू हा देवांचा मोठा शत्रु. प्रल्हादाचें देवाचें वेड जावें म्हणून त्याने अनेक उपाय केले–त्याला ठारहि मारण्याचा प्रयत्न केला. शेवटीं प्रल्हादाच्या रक्षणासाठी नृसिंहरूपाने येऊन परमेश्वराला हिरण्यकश्यपूचा वध करावा लागला. ही कथा येथे अभिप्रेत आहे. ओवी ११ वी = " माझी भक्ति करण्याऐवजीं प्रल्हादाची भक्ति केली तरी माझ्या भक्तीने जें त्यांना मिळावयाचें तें प्रल्हादाची भक्ति करणाऱ्यांना देतो. " ही कल्पना. 'एऱ्हवीं दैत्यकुळें साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरें ॥ ' नाहींतर तो दैत्याचा वंश खरा, पण इंद्रालाहि त्याच्यापेक्षा जास्त योग्यता मिळत नाही. 'परि मजसीं तुकितां तुका । तुटी नाही. ॥ ' त्यांची माझ्याबरोवर तुलना केली असतांना ते वजनाला कमी भरत नाहींत. चामा = कातडें. जोडती = मिळतात. लाहे = लाभते. तरे = तरते किंवा टिकाव धरते. सर्वज्ञता सरे = जाणतेपण मान्य होईल. भलतेणें = कोणत्याहि. 'आघवें मागील वावो ' = मागील सर्व पापें व्यर्थ ठरतील. वहाळ वोहळ = ओढे-नाले. 'विवंचना तंवचि घटे ' = चर्चा तोंपर्यंतच होते. घापती एकवटे = एकदम घातले जातात.

**अभ्यास :—**

१. परमेश्वराची प्राप्ति कोणास होते ? भक्तीवांचून मनुष्यास किंमत नाही हें कोणत्या दृष्टान्तावरून स्पष्ट होतें ? परमेश्वराची प्राप्ति होई-पर्यंतच कुळजातिवर्ण यांचे भेदभाव असतात, नंतर नाहीं हें स्पष्ट करण्यासाठीं कोणतीं उदाहरणें. घेतलीं आहेत ? २. समाजांतील कोणत्या लोकांना उद्देशून हे विचार असावेत ? कां ? ३. खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा: ( अ ) राजाज्ञेचीं अक्षरें......सकळ वस्तु ॥ ( आ ) जैसें तंवाचिवहाळ वोहळ.......गंगारूप ॥ ● ● ●

# २. ताटीचे अभंग

[ विषयपरिचय : मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरांची सर्वांत धाकटी बहीण; पण ज्ञानेश्वरांइतकेंच तिचें वैराग्य कडकडीत होतें. ती खरोखर नांवाप्रमाणे मुक्त होती. ज्ञानीयाचे राजे म्हणून समजले गेलेल्या आपल्या वडिल भावाला–ज्ञानेश्वराला–प्रसंगीं उपदेशाचे चार शब्द सांगावे हा तिचा अधिकार. ताटीच्या अभंगांतील उपदेश अशाच एका प्रसंगांतून निर्माण झाला. एके दिवशीं ज्ञानेश्वराला पाहिल्यावर या संन्याश्याच्या पोराचें दर्शन घडलें हा मोठाच अपशकुन झाला असें कुणीं अचरट माणसाने म्हटलें. त्यामुळे ज्ञानेश्वरांना राग आला. ते खोलींत जाऊन बसले आणि त्यांनी आंतून दार लावून घेतलें. तेव्हा मुक्ताबाईने हे अभंग रचले, म्हणून त्यांना ताटीचे अभंग म्हणतात. आपल्या भावाची समजूत करतांना मुक्ताबाईने ' संत तोच जाणा जगीं । दया क्षमा ज्याचे आंगीं । " असें सांगून मानापमानाच्या मिथ्या कल्पना मागे सारा आणि ताटी उघडा असें मोठ्या प्रेमळपणाने ज्ञानेश्वराला विनाविलें आहे. त्यांत प्रांजलपणा आहे, पण रुक्षपणा नाही. वडिल भाऊ जगावर रुसून बसला आहे आणि धाकटी बहीण प्रेमळ शब्दांनी त्याची समजूत घालते हा प्रसंगच किती काव्यमय आहे! त्यामुळे तात्त्विक स्वरूपाच्या या अभंगांतसुद्धा किती गोडी निर्माण झाली आहे तें पाहा ! ]

१

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥ १ ॥
विश्व रागें झालें वन्ही । सन्तें मुखें व्हावें पाणी ॥ २ ॥
शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥ ३ ॥
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

२

संत तोचि जाणा जगीं । दया क्षमा ज्याचे आंगीं ॥ १ ॥
लोभ अहंता नये मना । जगीं विरक्त तोची जाणा ॥ २ ॥
इह परलोकीं सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखीं ॥ ३ ॥
मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३

एक आपण साधु झाले । येर कोण वायां गेले ॥ १ ॥
उठें विकार ब्रह्मीं मूळ । अवघें मागेचें गाबाळ ॥ २ ॥
माया समूळ नुरे जेव्हा । विश्व ब्रह्म होईल तेव्हा ॥ ३ ॥
ऐसा उमज आदीं अन्तीं । मग सुखी व्हावें संतीं ॥ ४ ॥
चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

४

ब्रह्म जैसें तैशापरीं । आम्हां वडील भूतें सारीं ॥ १ ॥
हात आपुला आपण लागे । त्याचा करूं नये खेद ॥ २ ॥
जीभ दातांनी चाविली । कोणें बत्तिशी ताडिली ॥ ३ ॥
थोर दुखावलें मन । पुढे उदंड शाहाणें ॥ ४ ॥
चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचे ॥ ५ ॥
मन मारुनी उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ६ ॥

५

सुखसागर आपण व्हावें । जग बोधें निववावें ॥ १ ॥
बोधा करूं नये अंतर । साधू नाही आपपर ॥ २ ॥
जीव जीवासी पै द्यावा । मग करूं नये हेवा ॥ ३ ॥
तरुणोपाय चित्तीं धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

६

गिरीगव्हारे केशासाठी । रागें पुरवीली पाठी ॥ १ ॥
ऐसा नसावा संन्यासी । परमार्थाचा जो का द्वेषी ॥ २ ॥
घर बांधिलें डोंगरीं । विषया हिंडे दारोदारीं ॥ ३ ॥
काय केला योग धर्म । नाही अंतरीं निष्काम ॥ ४ ॥
गंगाजळहृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

७

शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरीं नाही देव त्याला ॥ १ ॥
अवघीं साधनें हातवटीं । मोलें मिळत नाही हाटीं ॥ २ ॥
अहो आपण तैसें व्हावें । अवघें अनुमानूनी घ्यावें ॥ ३ ॥
ऐसें केलें सद्गुरुनाथें । बापरखुमादेवीकांतें ॥ ४ ॥
तेथें कोणीं शिकवावें । सार साधूनियां घ्यावें ॥ ५ ॥
लडीवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायींचे ठायीं ॥ ६ ॥
तुम्ही तरूनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ७ ॥

मुक्ताबाई
सकल संतगाथा.

टीपा :—

'विश्वरागें...व्हावें पाणी' = जगांतील सर्व लोक जरी रागावले तरी संतांनी तो राग शांत करावा. लोकांचा रागरूपी वणवा सगळीकडे पेटला असला तरी संतांनी पाणी होऊन तो वणवा विझवावा. 'विश्वपट ब्रह्मदोरा' = ब्रह्म हाच दोरा. या दोऱ्याने विणलेलें कापड म्हणजे आपल्याला दिसतें तें विश्व. ब्रह्मांतून साऱ्या विश्वाची उत्पत्ति झाली ही कल्पना. 'उठे विकार... ब्रह्म होईल तेव्हा.' = मूळच्या शुद्ध परब्रह्मांत स्फुरलेला अहंकाररूपी विकार म्हणजेच माया. मायेमुळेच संसाराचें मृगजळ आपणाला दिसूं लागतें. मायेचा हा खोटा आभास नष्ट झाला म्हणजे विश्वाला आपल्या शुद्ध परब्रह्मस्वरूपाची जाणीव येते. अशी जाणीव झाली म्हणजे सर्व विश्वच ब्रह्म होतें. 'ब्रह्म जैसें... भूतें सारीं.' ज्याप्रमाणे ब्रह्म आम्हांला वंद्य त्याप्रमाणे जगांतील सर्व माणसें आम्हांला वंद्य. तीं सर्व ब्रह्माचींच रूपें. 'मन मारुनि उन्मन करा' = मनांत उठणाऱ्या क्रोध, चिंता इत्यादि विकारांचा नाश करा. तें शांत व निश्चळ होईल आणि त्याची समाधि लागेल असें करा. गंगाजळहृदय = गंगेच्या पाण्याप्रमाणे पवित्र असें मन. 'जीव मुद्दल ठायींचें ठायीं' = मुक्ताबाईचा जीव जसाचा तसाच, शुद्ध ब्रह्म. मायेच्या आभासामुळे त्याच्या स्वरूपांत फरक झाला नाही.

अभ्यास:—

१. संतांचीं कोणतीं लक्षणें मुक्ताबाईने या उपदेशांत सांगितलीं आहेत? २. ज्या वेळीं माया समूळ नष्ट होते त्या वेळीं कोणती जाणीव मनांत निर्माण होते? ३. 'लोक आपणांला अपशब्द बोलले तरी त्यांचा राग धरूं नये' असें मुक्ताबाई का सांगते? त्यासाठी कोणते दृष्टान्त तिने दिलेले आहेत? ४. 'गुहेंत जाऊन बसला किंवा डोंगरावर घर बांधलें तरी तें व्यर्थच' असें मुक्ताबाई कां सांगते? मग देवाची प्राप्ति होण्यासाठी आपणांस काय करावयास हवें? ५. यांतील कांही उत्कृष्ट सुभाषितें निवडा.

• • •

# ३. अभंगाष्टक

[ विषय-परिचय : संतकवींची अभंगवाणी मराठी वाङ्मयांत अमर झाली आहे. परमेश्वराविषयीं वाटणारा भक्तिभाव, त्याच्या भेटीविषयीं लागलेली तळमळ, पांडुरंगाच्या दर्शनाने मनाला वाटणारें समाधान इत्यादि अनेक भाव या अभंगांतून मोठ्या उत्कटतेने व्यक्त होत असतात. याबरोबरच लोकांना उपदेश करण्याचें कार्यहि यांची अभंगवाणी करते. अनेक वेळां ती संतांचें गुणगान गाते, नामाचा महिमा वर्णन करते, अन्तःकरणांतील खऱ्या भक्तीचा पुरस्कार करते व त्याबरोबरच समाजांतील ढोंगावर व दांभिकपणावर ती आघातहि करते. संतांच्या अभंगवाणीचें स्वरूप असें विविध आहे. त्यांतहि नामदेव व तुकाराम यांचे अभंग मराठींत विशेष गाजलेले आहेत. नामदेवाचा भोळा भक्तिभाव त्याच्या अभंगांतून प्रगट होतो, तर तुकारामाच्या अन्तःकरणांतील आर्त भक्तिभावाबरोबरच समाजांतील दांभिकपणाविरुद्ध बंड करून उठलेलें त्याचें परखड हृदयहि त्याच्या अभंगांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें. आजहि वारकऱ्यांच्या तोंडीं या दोघांचे अभंग शेकडोंनी आढळतात ही एकच गोष्ट त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष देण्यास पुरेशी आहे. त्यांच्या अभंगवाणीची गोडी किती अवीट आहे याची खालील आठ अभंगांवरून तुम्हांला कल्पना येईल. ]

## नामदेव

१

चंद्रसूर्यादि बिंबें लिहिताती सांग ।
परि प्रकाशाचें अंग लिहितां न ये ॥

संन्याशाचीं सोंगें आणिताती सांग।
परि वैराग्याचें अंग आणितां न ये ।।
नामा म्हणे कीर्तन करिताती सांग।
प्रेमाचें तें अंग आणितां न ये ।।

२

गोक्षीर लाविलें आंधळिया मुखीं।
तेथील पारखी जिव्हा जाणे ।।
तैसें देवा तुझें नाम निरंतर।
जिव्हेसी पाझर अमृताचे ।।
सोलूनिया केळें साखरें घोळिलें।
अंधारीं खादलें तरी गोड ।।
द्राक्षफळा घड सेवितां चोखड।
तयाहुनी गोड नाम तुझें ।।
आळूनियां क्षीर तुपाचिये आळें।
कालविलें गुळें गोड जैसे ।।
जाणोनीयां नामा करी विनवणी।
अमृताची खाणी नाम तुझें ।।

३

अग्निमाजी पडे बाळु । माता धावे कनवाळु ।।
तैसा धावे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।
सवेंचि झेपावे पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धावे ।।
वणवा लागलासे वनीं । पाडस चिंतित हरिणी ।।
नामा म्हणे मेघ जैसा । विनवितो चातक तैसा ।।

४

पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारां ।
पतीतपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ।। १ ।।
घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार ।
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ।। २ ।।
उच्छिष्टाचें शीत देवा ! न टाकिसी बाहेरीं ।
कोणी दिधली देवा एवढी भूषणाची थोरी ।। ३ ।।
सोडी देवा ब्रीद आतां नव्हेसि अभिमानी ।
पतीतपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ।। ४ ।।
नामा म्हणे देवा तुझें, नलगे मज कांहीं ।
प्रेम असो द्या चित्तीं म्हणुनी लागतसें पायीं ।। ५ ।।

नामदेव

नामदेवाची गाथा

## तुकाराम

१

कन्या सासुऱ्यासी जाये। मागे परतोनि पाहे।।
तैसें झालें माझ्या जिवा। केव्हां भेटसी केशवा।।
चुकलिया माये। बाळ हुरू हुरू पाहे।।
जीवनावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी।।

२

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी। मस्तक चरणीं ठेवीतसें।।
थोरीव सांडिली आपुली परिसें। नेणे शिवो कैसें लोखंडासी।।
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारें।।
भूतांची दया हें भांडवल संतां। आपुली ममता नाहीं देहीं।।
तुका म्हणे सुख पराविया सुखे। अमृत हें मुखें स्त्रवतसे।।

३

हिरा ठेवितां ऐरणीं। वांचे मारितां जो घणीं।।
तोचि मोल पावे खरा। करणीचा होय चुरा।।
मोहरा होय ताचि अंगें। सूत न जळे ज्याच्या संगें।।
तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे आघात।।

४

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी।।
उत्तमचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीवखाणी।।
परउपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणीआया।।

भूतदया गाई पशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥
शान्तिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥

—तुकारामाची गाथा

**टीपा :—**

पारखी = चव, परीक्षा. चोखड = चांगलें. अंकिला = अंकित स्वाधीन. वत्सरावें = वासरूं. ब्रीद = प्रतिज्ञा; बाणा. 'जीवनावेगळी मासोळी' = पाण्याबाहेर पडलेला मासा. थोरी = मोठेपणा. पराविया = दुसऱ्यांच्या. करणी = कृत्रिम, मोहरा = मणि,

**अभ्यास :—**

१. (अ) 'वरपांगीं सोंग नको; देवाबद्दल शुद्ध प्रेम हवें.' हें नामदेव कोणत्या उदाहरणांनी स्पष्ट करतात? (आ) नामाची गोडी कोणत्या दृष्टान्तांतून दिसते? (इ) 'तैसा धावे माझिया काजा ॥' तैसा म्हणजे कुणाप्रमाणे? (ई) 'पतीतपावन' असें देवाला म्हणावयास नामदेव कां तयार नाहीत? २. (अ) तुकारामाची परमेश्वराच्या भेटीविषयींची तळमळ कोणत्या दृष्टान्तांनी व्यक्त झाली आहे? (आ) तुकारामाच्या मतें संतांचीं वैशिष्ट्यें कोणतीं? (इ) सामान्य जनांना तुकारामांनी कोणता उपदेश केला आहे? ३. खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा:- (अ) घेसी तेव्हा देसी....कृपणाचें द्वार ॥ (आ) भूतांची दया हें...नाही देहीं ॥ ४. 'तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात' या विषयावर एक लहान निबंध लिहा.

• • •

# ४. किरातार्जुनयुद्ध

[ विषय-परिचय : पांडव वनवासाला गेले असतांना व्यासमुनि त्यांच्याकडे आले व अर्जुनाने तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न करावें व त्याच्याकडून पाशुपत अस्त्राची प्राप्ति करून घ्यावी असें त्यांनी धर्माला सुचविलें. त्या उपदेशाप्रमाणे आपल्या वडिल बंधूंचा आणि श्रेष्ठ ऋषि-वरांचा आशीर्वाद घेऊन तपश्चर्या करण्यासाठी अर्जुन निघाला, व हिमालय ओलांडून गंधमादन पर्वतावर तो येऊन पोह्रोचला. तेथे त्याला इंद्राचें दर्शन झालें. इंद्रानेहि तपःसामर्थ्याने शंकराला प्रसन्न करून पाशुपत अस्त्राची प्राप्ति करून घेण्यास अर्जुनाला सांगितलें. आणि त्याप्रमाणे शंकराला प्रसन्न करून घेण्यासाठी अर्जुनाने त्या अरण्यांत घोर तपश्चर्या करण्यास आरंभ केला. त्यापुढील कथाभाग खालील उताऱ्यांत आला आहे. अर्जुनाची तपश्चर्या, किराताचें आगमन व किराताचें व अर्जुनाचें युद्ध यांचें वर्णन मुक्तेश्वराने मोठ्या रसाळपणाने केलें आहे. युद्धाचें वर्णन करण्याची अगोदरच मुक्तेश्वराला मोठी आवड ! आणि तशांत हें युद्ध दोन अलौकिक व्यक्तींमधलें ! मुक्तेश्वराच्या प्रतिभेला या युद्धाचें वर्णन करतांना त्यामुळे अधिकच बहर आलेला तुम्हांला दिसेल. ]

अर्जुनें स्थिर करुनि मन । धैर्य बसविले निर्जनवन
प्रसन्न होय त्रिलोचन । ऐसा यत्न मांडिला ।। १ ।।
माथां मिरवे जटाभार । दर्भांकुरीं वेढिले चीर ।
प्रावर्ण व्याघ्रांबर । कृष्णाजिन आसना ।। २ ।।
प्रथम मासीं तपश्चर्या थोरे । तृतीय दिवशीं स्वीकारी आहार; ।
द्वितीय मासीं परमधीर । षष्ठ दिवशीं फळ भक्षी ।। ३ ।।
तृतीय मासामाजीं जाण । पक्षापक्षां फळजीवन ।
चतुर्थ मासीं पवन । निराहारी निर्जळीं ।। ४ ।।
खडतर तपश्चर्या निगुती । देखोनी सकळ ऋषींच्या पंक्ती ।
दुश्चित्त घेउनी शंकराप्रती । निवेदिती भयवार्ता ।। ५ ।।
शंकर म्हणे, 'ऋषी हो ! ऐका, । पार्थसंकल्प मज ठाउका, ।
तुम्हा करावया शंका । कारण कांही असेना ।। ६ ।।
वधावया शत्रुकुळातें । शस्त्रें मागे देवेंद्रातें, ।
तुम्हीं सर्वी स्वस्थचित्तें । चिंता कांही न करावी.' ।। ७ ।।

यावरी कौतुकें व्योमकेश । धरिता झाला किरातवेश ।
म्हणे, ' नावेक चाळवूं नरेश। पाठी पुरवूं कामना ' ॥८॥
सुवर्णवृक्ष सुकोमळ । किंवा साजे कनकाचळ ।
तेवी भासे जाश्वनीळ । कामकुरंग पारधी ॥ ९ ॥
भिल्लीवेशें शैलबाळी । रिद्धिसिद्धि मातृका मेळीं ।
सहस्र स्त्रियांचे मेळीं । महावनीं विचरत ॥ १० ॥
शूक नामा महा असुर । वराहरूपी महाक्रूर ।
पृष्ठीं भेदला असतां शर । प्राणधाकें पळतसे ॥ ११ ॥
धनुष्यबाण सज्जूनि मुष्टी । किरात लागला दिसे पाठीं ।
वराह येवोनी पार्थनिकटी । 'रक्षी' 'रक्षी' म्हणतसे. ॥१२॥
येरु मौनें जपासनीं । संकेत दावी उभउनी पाणी, ।
परी तें नायकोनि कानीं । पारधियें वधिला. ॥ १३ ॥
पार्थ म्हणे पारधियातें, । ' मातें शरण आलिया एथे ।
विशेष वारिलिया हातें । वराह कैसा मारिला ? ॥ १४ ॥
नव्हे हा पारधियाचा धर्म; । श्रेष्ठ म्हणती हा अधर्म. ' ।
किरात म्हणे, 'तूं नरेंद्रोत्तम । परी आविवेक जलपसी. ॥१५॥
माझिये बाणीं केला स्पर्शु । माझा विभाग अरण्यपशु ।
तो म्यां मारिला म्हणोनी दोषू । तूं कां मातें ठेविशी ॥१६॥
हें वन माझें वसातिस्थान. ' । पार्थ म्हणे, ' माझा बाण ।
एकट असतां पावशी मरण; । असंख्य मातें रक्षिती. ॥१७॥
माझे हेळूनियां वचन । घेतला आरण्यपशूचा प्राण, ।
यालागी तुतें यमसदन । दाखवीन तात्काळीं. ' ॥ १८ ॥
दोघेजणीं वाहिलीं चापें । दोघे खवळले महाकोपें, ।
एकमेकातें साटोपें । लक्षूनियां विंधिती ॥ १९ ॥

अग्नि, पर्जन्य, वात, गिरी, । वज्रें, चक्रें, गदाप्रहारीं ।
पार्थ ताडितां अंतरीं । सदाशिव संतोषे. ॥ २० ॥
नाना शस्त्रें सोडितां वेगीं । एकहि न लागे किरीटी अंगीं ।
जेवि का नामस्मरत्यालागी । दोषें स्पर्श न कीजे. ॥ २१ ॥
असंख्य बाण विंधितां हातें । रिते पडले अक्षय भाते, ।
पार्थ म्हणे, ' नवल एथे । आजि देखों संग्रामीं ! ॥२२॥
माझिया बाणांचा आघात । साहो न शकती देवदैत्य ।
तें आजि झालें सर्व व्यर्थ। एकहि न लागे तयातें.' ॥ २३ ॥
मेघवृष्टी होता प्रबळ । चळे न ढळे जैसा शैल ॥
तेवी निश्चल जाश्वनीळ। पार्थबाण प्रकटतां. ॥ २४ ॥
कां निंदेचे घाय तिखट । एकही न मनीं ब्रह्मनिष्ठ; ।
तेवी निवान्त नीळकंठ ।. अर्जुनास्त्र लागतां ॥ २५ ॥
पार्थ मानूनी कौतुक । म्हणे, ' हा होईल त्रिपुरान्तक ।
त्यावांचूनी माझे सायक । कोण साहे त्रैलोक्यीं ?' ॥ २६ ॥
वर्षला शरांचा पाऊस । देखोनी तोषला व्योमकेश, ।
अर्जुना नावरे आवेश । बाहुयुद्धा मिसळला. ॥ २७ ॥
मल्लयुद्धीं आंग कवळी, । वज्रमुष्टी ताडितां बळी ।
अधिक तोषोनी चंद्रमौळी । 'भलारे ! भला' म्हणतसे. ॥२८॥
किरातराजें तयेकाळीं । पार्थ कवळितां बाहुजाळीं ।
मूर्च्छा पावोनी भूतळीं । अचेतन पडियेला. ॥ २९ ॥
सर्वेचि सावध होउनी वेगा, । पूजा मांडिली पार्थिवलिंगा, ।
पारवीं अंतरा ठाकोनी उगा । चोज दृष्टी पाहातसे. ॥ ३० ॥
पार्थिवलिंगीं पुष्पांजली । वोपिली ते किरातमौळीं ।
दृष्टी देखोनी चंद्रमौळी । सिद्धसंकेत लाधला ॥ ३१ ॥

जाणवलें अन्तर्यामीं । म्हणे, 'हा हो शंकरस्वामी.' ।
लोटांगण घालूनी अन्तर्यामीं । स्तुती मुखें वदतसे. ॥ ३२ ॥
'कपर्दी ! सर्वदेवेश ! भव ! । अंगारनेत्र ! श्रीशिव ! ।
देवदेव ! महादेव ! । नीलग्रीव ! जटाधारी ! ॥ ३३ ॥
तूंची कारण परम । विभू त्र्यंबक ! सर्वोत्तम, ।
देवत्रया विश्राम । आनंदधाम तूं एक ॥ ३४ ॥
लीले करिशी विश्वजनन । कृपादृष्टी प्रतिपालन ।
प्रलयीं करूनी सर्व दहन । शेष उरशी तूं एक ॥ ३५ ॥
शिव म्हणतां विष्णु जाण, । विष्णु म्हणतां तूं महेश पूर्ण; ।
नोळखोनी मूढ श्वान । भेदभावें भुंकती ॥ ३६ ॥
दक्षयज्ञविनाशना ! । हरिहरा ! ललाटनयना ! ।
कृपा करावी परम दीना । शरण चरणां मी स्वामिया ! ॥३७॥
देहाभिमानें देहाच्या उर्मी । नकळत मिसळलों जी ! संग्रामीं, ।
तंव तूं पतितपावन नामीं । क्षमा करी दासीं या.' ॥ ३८ ॥
ऐसे ऐकोनी स्तवन । संतोषला गिरिजारमण, ।
परम प्रीती आलिंगन । पार्थालागी दीधलें. ॥ ३९ ॥
म्हणे, 'पूर्वी त्वां स्वधर्मी । नारायणसमागमीं ।
तपश्चर्या बदरिकाश्रमी । बहुकाळ त्वां केली. ॥ ४० ॥
भूभार फेडावयालागीं । अवतरलासी कृष्णसंगीं ।
निर्मळ भजनें युगानुयुगी । आराधिलें त्वां मज. ॥ ४१ ॥
भक्तिने तोषविलें मातें, । कृपेने पावलों तुतें ।
जें इच्छिजे तुझेनि चित्तें । तें मज माग पवित्रा !' ॥ ४२ ॥
कवळूनिया उभय चरणां । अर्जुन म्हणे, 'मल्लिकार्जुना ! ।
पूर्वी कार्तवीर्य अर्जुना । वधविलें ज्या परी. ॥ ४३ ॥

प्रसन्न झाला श्रीरेणुकासुता । तैसेचि कौरवांच्या घाता ।
यालागी मातें कुमारताता ! । साहाय्य झालें पाहिजे. ॥ ४४ ॥
अस्त्र तुझें अत्यद्भुत । ज्यातें म्हणती पाशुपत ।
तें मज देऊनी सनाथ । स्वामीने केलें पाहिजे. ' ॥ ४५ ॥
वरद हस्त ठेवूनिया माथां । शंकर म्हणे, ' कुंतीसुता ! ।
माझिया कृपें पाशुपता । अस्त्रालागी देतसें. ' ॥ ४६ ॥

मुक्तेश्वर
वनपर्व

टीपा :—

चीर = वस्त्र. पक्षपक्षां = दर पंधरवड्यास. निगुती = निभ्रांत. व्योमकेश = शंकर. नावेक = क्षणभर. चाळवूं = झुलवूं. जाश्वनळि = शंकर. कामकुरंगपारधी = मदनरूपी हरिणाचा शिकारी (असा शंकर). शैलबाळी = पार्वती. मातृका = एक देवता. ' एकट असतां पावशी मरण । असंख्य मातें रक्षिती, ' = माझ्या एकाच बाणाने तूं मरशील. तथापि माझ्याजवळ असणारे पुष्कळ बाण माझें रक्षण करणारे आहेत. हेळूनिया = अवमानून. साटोपें = आवेशाने. नामस्मरत्या = नामस्मरण करणाऱ्या. सायक = बाण. ओपिली = अर्पण केली. 'सिद्ध संकेत लाधला' = संकल्प साधला. अक्षय भाता = ज्या भात्यांतील बाण कधी संपत नाहीत असा भाता. घाय = घाव. चोज = कौतुक. दक्षयज्ञविनाशना = दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा शंकराने वीरभद्राकडून नाश करविला होता. नारायणसमागमीं = पूर्वी नर व नारायण यांनी बदरिकाश्रमांत तप केलें. अर्जुन हा नराचा व श्रीकृष्ण हा नारायणाचा अवतार होय. कार्तवीर्य = सहस्रार्जुन. श्रीरेणुकासुत = परशुराम. कुमारतात = कार्तिकस्वामींचा पिता.

अभ्यासः—

१. अर्जुनाच्या तपश्चर्येचें स्वरूप कसें होतें ? २. अर्जुन व किरात यांच्यामध्ये युद्ध कां झालें ? त्याचा परिणाम काय झाला ? ३. शंकर व अर्जुन यांना उद्देशून कोणकोणतीं नांवें आलीं आहेत ? ४. खालील ओळींचा अर्थ स्पष्ट कराः—' कां निंदेचे घाय तिखट......अर्जुनास्त्र लागतां । २५ ॥ ' शिव म्हणतां विष्णु जाण...भेदवादें भुंकती ॥३६॥

# ५. रुक्मिणीस उपदेश

[ **विषय-परिचय :** कृष्ण-रुक्मिणी यांचा विवाह हा मराठी कवींचा आवडता विषय आहे व त्यावर प्राचीन काळापासून काव्यलेखन होत आलें आहे. सामराज या कवीने अष्टसर्गात्मक रुक्मिणीहरण हें महाकाव्य लिहिलें असून त्यांतीलच पुढील उतारा घेतलेला आहे. रुक्मिणी लग्न होऊन श्रीकृष्णाबरोबर जाणार हें लक्षांत ठेवून या प्रसंगीं तिच्या आईने सासरी कसें वागावें याबद्दल उपदेश केला आहे. ]

माझ्या मनायोग्य घडोन आलें, । परंतु दु:खास्पद येक जालें ।।
जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भीं, । मी येकली राहिन ये विदर्भीं ।।१।।
कठीण आहे स्थिति सासुऱ्याची, । पडे मला गोष्टि तुझ्या जिवाची ।।
तूझे गुणीं न्यून कदापि नाही, । तथापि पाहे सिकऊंच कांही ।।२।।
घालाघाली घालिती नित्य सासा, । टाकूं बाई नेदिती हा उसासा; ।।
पोटागीची माय मी दूर जालें, । लागे आतां नांदणें त्याजखाले. ।।३।।
प्राणेश्वराच्या अति मान्य माता, । अलीकडे त्याहुन जाण आता ।।
तो सासरा साधु बहूत आहे, । आज्ञेंत त्याचे उगलीच राहें. । ४ ।।
असेत जे तूज बहूत जावा, । विरोध त्यांसी न करीत जावा; ।।
त्वां आपलीं आवरिजेत मूलें । जे नित्य होती कलहास मूळें ।।५।।
ते स्वामिसेवा तुजला घडावी, । त्याची तुला आवडि आवडावी; ।।
त्याच्या मनासी मन मेळवावें, । त्वां नित्य त्याचे मिळणीं मिळावें. ।।६।।
टाकून बाई अभिमान द्यावा, । संसार हा गोड करून घ्यावा; ।।
मुखास येती जरि शब्द मोठे, । तूझ्या गुणांचें तरि मूळ तूटे. ।।७।।

प्रगल्भता येथुन आदरावी, । हे लोकलज्जा हृदयीं धरावी; ॥
लोकापवादास बहूत भ्यावें; । टाकून चित्तांतुन पाप द्यावें. ॥८॥
सर्वांपुढें सत्वर त्वां उठावें, । ते नीजल्यानंतर त्वां निजावें; ॥
आदासपर्यंतहि अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन त्वां करावें. ॥९॥
त्यां वागतां पल्लव नीट घ्यावा, । पाचारिल्या मंजुळ जाब द्यावा; ॥
तूं खालतीं पाहुनि नित्य चालें । तूं बोलवील्याविण गे, न बोलें. ॥१०॥
लावीत जा कुंकुम नित्य भाळीं, । सौभाग्य संसूचक सर्वकाळीं, ॥
घालीत जा कज्जल नित्य डोळां, । सिके बरा तेथिल सर्व मोळा ॥११॥
सदा शुचिष्मन्त तुवां असावें, । सदा सतींसन्निध, गे बसावें; ॥
जे उंबऱ्याबाहिर पाय टाकी । ते आपला लौकिक काय झांकी. ॥१२॥
सन्मान सर्वां वडिलांस द्यावा, । कुलीन हा शब्द म्हणोन घ्यावा; ॥
न घेसि पैशून्य कदापि कानीं, । तरीच तूझें यश लोक वानी. ॥१३॥
तूं संकटीं हा निजधर्म राखें; । कदापि संसारसुखें न माखे; ॥
तत्काळ घाली अतिथीस भिक्षा, । पतिव्रतांची तरि हेच दीक्षा. ॥१४॥
त्वां सासुरां उत्तम नांदिजे ते, । पतिव्रतासाधन साधिजे तें; ॥
असी तुझी येइल कीर्ति जेव्हा, । मला महाभूषण होय तेव्हा. ॥१५॥

समस्तां भूतीं त्वां निरुपम दया नित्य धरिजे,
भुकेले, तान्हेले, शशिमुखि, विशेषें समजिजे. ।
विलासें लक्ष्मीच्या स्वसुहृदवर्गा विसरिजे
अनाथा दीनांचा निशिदिन परामर्ष करिजे. ॥१६॥

प्रपंचीं ये देवद्विजचरणनिष्ठा, तुज असो,
असत्याचा, बाई, तिळभरि घरीं संग्रह नसो. ।
असत्यें हें पाहें अखिलहि महापातक जडे,
जनामध्यें तैसा सहज निज विश्वासहि उडे. ॥१७॥
उपेक्षाबुद्धीने विचर, चतुरे, संसृतिसुखीं
नको लागों देऊं किमपि, विमळे, पातक नखीं; ।
नको राहों देऊं परुषवचनोच्चारण मुखीं,
अये, या दुर्वादेंकरुन तुटती सर्वहि सुखी. ॥१८॥
मदें तारुण्याच्या कुळवति अहंकार न करीं,
विनीतें वैदर्भी पतिवचन हातावरि धरीं; ।
पतीची हे सेवा निरुपम महा साधन तुझें,
कुळस्त्रीला बाई पतिविण नसें दैवत दुजें. ॥१९॥
हा तूज शिक्षाविधि मात्र केला, । सर्वांस बाई उपदेश जाला; ॥
वर्तोत तैशाच समस्त मूली, । घरोघरीं मृण्मय जाण चूली. ॥२०॥

सामराज
—रुक्मिणीहरण

**टीपा :—**

सिंधुगर्भी = समुद्रवलयांकित द्वारकेंत. पोटाग = कळवळा. आदासपर्यंत = नोकराचाकरांपर्यंत. पल्लव = पदर. मोळा = वागण्याची पद्धत. शुचिष्मन्त = पवित्र. पैशुन्य = चहाडखोरपणा. संसृति = संसार. परुषवचनोच्चारण = कठोर शब्द उच्चारणें. दुर्वाद = वाईट संभाषण. मृण्मय = मातीच्या.

**अभ्यास :—**

१. सासरीं वागतांना कोणत्या रीतीनें वागावें असा उपदेश रुक्मिणीला तिच्या आईने केला आहे ? २. हा उपदेश करतांना तिच्या मनाची स्थिति कशी झाली होती ? ३. या कवितेंतील तीन सुभाषितें शोधून काढा.

९८५९० ५१०५ ९३०१ २४।८।५१

## ६. कर्णशल्य संवाद

[ विषय-परिचय : भारतीय युद्धाच्या वेळीं अर्जुनाला जसा कृष्ण हा कुशल सारथी मिळाला होता, तसाच कर्णाला शल्य हा सारथी मिळाला होता. परंतु शल्याच्या मनांत कर्णाबद्दल यत्किंचितहि आस्था नव्हती, म्हणून तो कर्णाचा पदोपदीं अपमान करीत असे. शल्याने अर्जुनाबद्दल पक्षपात दाखवावा व कर्णाचा तेजोभंग करावा असे प्रसंग अनेक आले. या वेळीं कर्णाचा अविचलपणा व वीरवृत्ति उफाळून येई व तो शल्यास प्रत्युत्तर देई. असाच एक प्रसंग कर्णपर्वांत मोरोपंतांनीं रंगविला आहे. प्रस्तुत प्रसंगवर्णनांतील भाषेचें ओजस्वी स्वरूप, संवादरचनाचातुर्य आणि कर्ण-शल्यांचें मार्मिक स्वभावरेखन सहजच मनोरम वाटेल. ]

कर्ण—

‘ या दृढ मदभिप्रायापासुनि वारूं शके न शक्र मला ।
मर्त्यांची काय कथा प्राकृतसा काय कर्ण हा गमला ? ’ ।। १ ।।

शल्य—

शल्य म्हणे, ‘ राधेया, जेव्हा तुझिया स्मरोनि कर्मांतें ।
अर्जुन तीव्र शरांनी समरीं भेदील सर्व मर्मांतें ।। २ ।।
तेव्हा पश्चात्तापा बापा तूं पावशील पापाने ।
सापाने धरिला प्लव न जगे, बडबडसि तूं तसा पानें ।। ३ ।।
तूं विजयासि वधाया वांछिसि हें कोण जाणता साहे ।
अंबांक-स्थित शिशु शशिमंडळ कवळावया जसा पाहे ।। ४ ।।
श्वान स्व-पोषकाचा सदनाच्या आश्रयें उभा राहे ।
जिकडे वनांत गर्जे शार्दूल तया दिशेकडे पाहे ।। ५ ।।

भुंके बळें यथेष्ट व्यथित करी निकट-वर्ति-जन-कर्णा ।
अर्जुन दृष्टि न पडला तोंचि तसा भुंकतोसि तूं कर्णा ॥ ६ '।
शश-मंडळांत कोल्हा म्हणतो 'मी सिंह,' वल्गना करितो ।
जोंवरि न पाहिला गज-मुक्ता-फळ-कवळ-भाक्षिता हरि तो.' ॥७॥

कर्ण—

'मी आपणासि जाणें, जाणें त्या जिष्णुलाहि तत्त्वानें ।
तैसे न जाणिजे त्वां इतरें वा सत्त्वहीन सत्त्वानें ॥ ८ ॥
पार्थवधाचें साधन आहे तें सांगतों तुला जेणें ।
आज द्वैरथ-युद्धीं विजयाचे प्राण निश्चयें घेणें ॥ ९ ॥
आहे अहिमय सायक मृदु-चंदन-चूर्ण पूर्ण भात्यांत ।
त्यावांचुनि शर दुसरा नाहचि क्षोणि-वल्लभा त्यांत ॥ १० ॥
तो आहेय शरोत्तम सोडुनि मी मेरुतेंहि फोडीन ।
कवचाची काय कथा पार्थी की केशवींच सोडीन ॥ ११ ॥
भ्यालासि मूढ-बुद्धे बडबडसी फार वानिसी अरिला ।
भाव तुझा मज कळला धीर तुझा मृत्युच्या भयें हरिला ॥ १२ ॥
ते मारतील मज की त्यांना मारीन मी स्वबळ जाणें ।
कृष्णाला कर्ण न मी तनु टाकुनि एकदां असें जाणें ॥ १३ ॥
दोघांची काय कथा जरि कृष्णार्जुन सहस्र येतील ।
तरि माझे शर त्यांच्या प्राणधनातें हिरोनि घेतील ॥ १४ ॥

तुज भेदिले परांनी स्पष्ट म्हणुनि बोलसी असें खोटें ।
सर्वां पापांमध्ये हें मित्र-द्रोह पाप मज मोठें ॥ १५ ॥
भ्याडासि भेडसावीं मी भ्याया उपजलों नसें कांहीं !
विक्रमयश साधाया झालोंसें, चाल ! पथ पुढे पाहीं ॥ १६ ॥

मोरोपंत
आर्याभारत ' कर्णपर्व '

टीपा :--

मदभिप्राय = अर्जुनाचा वध करणें हा माझा उद्देश आहे. शक्र = इंद्र. प्राकृत = सामान्य. प्लव = बेडूक. बडबडसि तूं तसा पानें = दारू प्यालेल्या-प्रमाणे तूं बडबड करीत आहेस. अंबांकस्थित = आईच्या मांडीवर असलेला. शार्दूल = वाघ. जन-कर्णां = लोकांच्या कानांना. शशमंडळ = सशांचा समुदाय. गज-मुक्ता-फळ-कवळ = हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्याचा घास. हरी = सिंह. जिष्णु = अर्जुन. सायक = बाण. क्षोणीवल्लभ = पृथ्वीपति. आहेय = सर्पाचा.

अभ्यास :--

१. शल्याने कर्णाचा तेजोभंग कोणत्या उदाहरणांनी केला ? २. कर्णानें शल्याला कोणतें उत्तर दिलें ? ३. अर्जुनाचीं कोणकोणतीं नांवें येथे आलीं आहेत ? ४. कर्णाच्या स्वभावाचीं कोणतीं वैशिष्ट्यें आढळतात ? ५. मोरोपंतांच्या प्रस्तुत कवितेंतलि अनुप्रास, यमक, उपमा व दृष्टान्त हे अलंकार स्पष्ट करा.

• • •

# ७. सतारीचे बोल

[ **विषय-परिचय :** युगप्रवर्तक कवि म्हणून केशवसुतांना आधुनिक कविमंडळांत मान आहे. अन्यायाविरुद्ध वाचा फोडणारे कवि म्हणून जसे ते प्रसिद्ध आहेत, त्याचप्रमाणे आत्मनिष्ठ कवि म्हणूनहि ते प्रसिद्ध आहेत. मानवी जीवनांत साहित्य-संगीत इत्यादि ललितकलांना फार मोठें स्थान आहे व तें असावें असें केशवसुतांना वाटतें. सतारीच्या नाद-माधुर्यानें कवीवर कोणते परिणाम झाले याचें चित्र येथे मोठ्या रसाळपणानें रंगविलेलें आहे. नादब्रह्माच्या साक्षात्काराने व्यक्तिमात्राची संकुचितता कशी नष्ट होते, आणि दुःख कमी होऊन व्यक्तिमात्रांत उदात्तता येते हें यांत शोधून पाहा. ]

काळोखाची रजनी होती
हृदयीं भरल्या होत्या खंती;
अंधारांताचि गढलें सारें
लक्ष्य न लक्षी वरचे तारे;
विमनस्कपणें स्वपदें उचलित
रस्त्यांतुनि मी होतों हिंडत;
एका खिडकींतुनि सूर तदा
पडले—दिड दा, दिड दा, दिड दा ! १
जड हृदयीं जग जड हें याचा
प्रत्यय होता प्रकटत साचा
जड तें खोटें हें मात्र कसें

तें न कळे; मज जडलेंच पिसें.
काय करावें, कोठे जावें,
नुमजे मजला की विष खावें ।
मग मज कैसे रुचतील वदा
ध्वनि हे—दिड दा, दिड दा, दिड दा ? २
सोसाट्याचें वादळ येतें
तरि तें तेव्हा मज मानवतें;
भुतें भोवतीं जरि आरडतीं
तरि तीं खचिताचि मज आवडतीं;
कारण आंतिल विषण्ण वृत्ति
बाह्य भैरवीं धरिते प्रीति;
सहज कसे तिज करणार फिदा
रव ते—दिड दा, दिड दा, दिड दा ? ३
ऐकुनि ते मज जो त्वेष चढे,
त्यासरशी त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मीं हात हिसकिला;
पुटपुटलोंहि अपशब्दांला;
म्हटलें—" आटप, आटप मूर्खा !
सतार फोडुनि टाकसी न कां !

पिरपिर कसली खुशालचंदा,
  करिसी—दिड दा, दिड दा, दिड दा!" ४
सरलों पुढता चार पावलें,
तों मज न कळे काय जहालें;
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरि माघारीं;
ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलों
असा स्ववशता विसरुनि बसलों—
एका ओट्यांवरी स्थिर तदा
  ऐकत—दिड दा, दिड दा, दिड दा! ५
तेथ कोपरें अंकीं टेकुनि
करांजलीला मस्तक देउनि
बसलों; इतुक्यामाजी करुणा—
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकृष्ट करी; हृदय निवालें,
तन्मय झालें, द्रवलें; आलें—
लोचनांतुनी तोय कितिकदा
  ऐकत असतां—दिड दा, दिड दा! ६

स्कंधीं माझ्या हात ठेवुनी
आश्वासी मज गमलें कोणी,
म्हणे— " खेद कां इतुका करिसी ?
जिवास कां बा असा त्राससी ?
धीर धरी रे !— धीरापोटीं
असतीं मोठीं फळें गोमटीं !
ऐक, मनींच्या हरितील गदा
ध्वनि हे—दिड दा, दिड दा, दिड दा !॥ ७
आशाप्रेरक निघूं लागले
सूर, तधी मीं डोळे पुशिले;
वरती मग मीं नजर फिरविली,
नक्षत्रें तो अगणित दिसलीं;
अस्तित्वाची त्यांच्या नव्हती
हा वेळवरी दादच मज ती।
" तम अल्प-द्युति बहु " या शब्दां
वदती रव ते—दिड दा, दिड दा। ८
वाद्यांतुनि त्या निघती नंतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर;
तो मज गमलें विभुती माझी

स्फुरत पसरली विश्वमाजी;
दिक्कालासहि अतीत झालों
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां—दिड दा, दिड दा ! ९
प्रेमरसाचे मधुर बोल ते
वाद्य लागतां बोलायातें,
भुललों देखुनि सकलहि सुंदर;
सुरांगना तो नाचति भूवर
स्वर्ग धरेला चुंबायाला
खाली लवला—मजला गमला !
अशा वितरिती अत्यानंदा
ध्वनि ते—दिड दा, दिड दा, दिड दा ! १०
शांत वाजली गती शेवटीं;
शांत धरित्री, शांत निशा ती,
शांतच वारें, शांतच तारे,
शांतच हृदयीं झालें सारें !
अशा सुखें मी सदना आलों,

शांतींत अहा! झोपी गेलों;
बोल बोललों परी कितिकदा
स्वप्नीं--दिड दा, दिड दा, दिड दा! ११

केशवसुत
• केशवसुताची कविता

**टीपा :--**

गदा = रोग. तम अल्प-द्युति बहु = अंधार थोडा (नैराश्य थोडें) पण प्रकाश पुष्कळ (आशा पुष्कळ). दिक्कालासहि अतीत झालों = स्थळ व काळाच्या बंधनापलिकडे गेलों. शान्त या शब्दाची शेवटच्या कडव्यांतील पुनरुक्ति सहेतुक आहे. शांततेचा व प्रसन्नत्वाचा परिणाम हा शब्दांच्या उच्चारणांतून व्हावा हा कवीचा हेतु आहे. पालुपदांत प्रत्येक वेळीं दिड दा ची नादमधुर योजना सतारीच्या ध्वनीची कल्पना आणून देण्यास समर्थ आहे. शब्द, नाद, अर्थ, भव्य कल्पना या सर्वच दृष्टींनी ही कविता उत्कृष्ट आहे.

**अभ्यास :--**

१. कवीच्या मनाच्या दोन वृत्ती स्पष्ट करा. या वृत्तींत फरक कसकसा पडला तें सांगा. २. खालील ओळींतील कल्पना संदर्भासह स्पष्ट करा:- (अ) " तम अल्प-द्युति बहु, या शब्दां। वदती रव ते-दिड दा, दिड दा।" (आ) तों मज गमलें विभुती माझी। दिक्कालासहि अतीत झालों॥ (इ) शांतच हृदयीं झालें सारें। ३. 'संगीत सौंदर्याचा मनावरील परिणाम' या विषयावर २५ ओळी निबंध लिहा.

• • •

# ८. ब्राह्मण किंवा महार

[ **विषय-परिचय :** केशवसुतांनी विशाल मानवतावादाचा पुरस्कार ‘ तुतारी, नवा शिपाई ’ इत्यादि कवितांतून केला व संकुचित जातिभेद व निर्दय रूढी यांना दूर ठेवण्यास बजावलें. सामाजिक ऐक्य, बंधुता, समानता यांचा मंत्र रे. टिळक यांनी केशवसुतांप्रमाणेच आपल्या अनेक कवितांतून म्हटला आहे. आपल्या समाजांतील जाती व धर्म यांत भेदाभेदांमुळें तुकडे पडले आहेत, ते जोडायाचे असतील तर रे. टिळक यांनी या कवितेंत सांगितलेले विचार आत्मसात् करणें आवश्यक आहे. या विचारांना साजेशी सरळ, स्पष्ट व ओजस्वी भाषाशैली येथे तुम्हांस सहजच जाणवेल. ]

मी ब्राह्मण वा महार मी
गणीं न कवणालाच कमी.
या सृष्टींतिल दिव्यपण;
तेंच तेंच हें मनुजपण
मांगल्याची ही ठेव,
हीस्तव देइन मी जीव;
हिच्याहि मोला
गणी न त्याला,
महाखलाला
नीच, नीचतर गणीन मी
जन्मभूमिसेवाधर्मी. १

हिंद्भूमि माझी जननी,
आले हीच्या कुशींतुनी
हिरेच अवघे माझे ते
मन्मन त्यां मोहुन जातें;
मलांत पडले,
खनींत द्डले,
मुकुटीं जडले,
अवघे उचलुन घेइन मी
जन्मभूमिसेवाधर्मी. २
विपन्नता ज्यांच्यापाठी
जीव कळवळे त्यांसाठी;
अज्ञपणा ग्रासी ज्यातें
प्रियतर दुर्बल मज ते ते !
त्यजुनी सकलां,
रुग्ण दुर्बला
उचली बाला
जननी; तीसम वेडा मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ३
मानामानाचें गोंवें
कसें असें कवणा ठावें !

खाइन अवघ्यांच्या लाथा,
देइन सेवेला माथा;
निजभूचें ऋण,
अवघें फेडिन,
मरून जाइन !
रक्षिन गुरुपद माझें मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ४

होइन नीचाहुन नीच
करीन अवघ्यांना उंच;
ते ब्राह्मण मग महार मी
कोण गणी मग मला कमी
कमी गणीना
कांहि म्हणेना
कुणी, तयांना
विचारितों मग कसला मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ५

पांच कशाचे, हे जितुके
हिंदभूमिबालक तितुके

मम देहाचे प्राण खरे
कसेहि असले तरि सारे !
जें वाटे तें
सांगायातें
शब्द न पुरते,
धरितों मौना यास्तव मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ६

ना. वा. टिळक
टिळकांची कविता

टीपा :--

जन्मभूमिसेवाधर्मी = जन्मभूमि जो भारत देश त्याची सेवा करणें हाच धर्म ज्याचा आहे तो मी. मानामानाचें गोंवें = मानापमानाचा गुंता.

अभ्यास :--

१. केशवसुतांची ' नवा शिपाई ' व टिळकांची ' ब्राह्मण किंवा महार ' या कवितेंतील साम्यदर्शक विचार सांगा. २. कवीला ' ब्राह्मण किंवा महार ' यांत कोणीच कमी नाही असें कां वाटतें ? कवीचें ध्येय काय आहे ? ३. कवीचा भारतदेशाबद्दलचा अभिमान कशा रीतीने स्पष्ट होतो ? ४. खालील चरणांतील कल्पना स्पष्ट कराः-(अ) मानामानाचें गोंवें, कसें असें कवणा ठावें ? ( आ ) रक्षित गुरुपद माझें मी जन्मभूमि-सेवाधर्मी ( इ ) होइन नीचाहुन नीच, करीन अवघ्यांना उंच; !

• • •

# ९. विरामचिन्हें

[ **विषय–परिचय** : मौलिक प्रतिभा, तरल कल्पनाविलास आणि अद्वितीय भाषाप्रभुत्व हीं गडकऱ्यांच्या कवितेचीं वैशिष्ट्यें आहेत आणि तीं सर्व या कवितेंत सहजच आढळतात. व्याकरणासारख्या रुक्ष विषयाकडे कवीचें लक्ष जातें आणि व्याकरणांतील विरामचिह्नांप्रमाणे जीवनांतील विरामचिन्हें प्रकट करण्यांत कवीचें बुद्धिचापल्य व कल्पनाविलास यांचें दर्शन होतें. या कवितेंत एकापेक्षा एक असे वरचढ विचार, विरामचिह्नांच्या रूपकांतून कवीने कसे व्यक्त केले आहेत तें अभ्यसनीय ठरतील. भावनेची उत्कटता येथे नाही, थोडीशी कृत्रिमताच जाणवेल; पण त्यांतहि गडकऱ्यांचीं वैशिष्ट्यें स्पष्ट होतील. ]

जेव्हा जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे,
तेव्हा 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोहीकडे ! ॥ १ ॥
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हे कोण ? कोठे असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्या पलिकडे तें काय ? केव्हा ? कसे ?
जें तें पाहुनि यापरी भकतसें; दृक्संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसें तैं 'प्रश्नचिन्हां'कित ! ॥ २ ॥
अर्धांगी पुढती करी वश मना, शृंगारदेवी नटे;
अर्धे जीवन सार्थ होइल इथे साक्षी मनाची पटे,

प्रेमाने मग एकजीव बनता भूमीवरी स्वर्ग ये !
केला ‘ अर्धविराम ’ तेथ; गमलें जेथून हालूं नये ! ।। ३ ।।
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमवितीं; लागे मुळी अंत न,
त्या काळीं मग जाहलें सहजची ‘ उद्गार ’ वाची मन ! ।। ४ ।।
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसती चित्ता कराया वश !
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथे असें जाहला,
देवा ! ‘ पूर्णविराम ’ त्या तव पदीं दे शीघ्र आता मला ! ।। ५ ।।

गोविंदाग्रज
‘ वाग्वैजयंती ’

टीपा :—

दृक् = दृष्टि; भकतसे = बडबड करीत असे; सद्यश = चांगलें यश; चिरं = कायमचा.

अभ्यास :—

१. जीवनांत स्वल्पविराम व प्रश्नचिह्नें केव्हा निर्माणहोतात ?
२. कवीला जीवनांत अर्धविराम केव्हा घ्यावा असें वाटतें ? का ?
३. देवाच्या पायांजवळ पूर्णविराम हवा म्हणजे काय ? तो कां हवा ?
४. व्याकरणांतील विरामचिह्नें व जीवनांतील विरामाचिह्नें यांतील साम्य स्पष्ट करा.

# १०. तृणपुष्प

[ विषय-परिचय : बालकवि म्हणजे खरेखरे निसर्ग-कवि ! निसर्गांतील सर्व लहानमोठ्या वस्तूंबद्दल त्यांना विलक्षण ओढ वाटते. लहानशा वस्तूंतहि कांहीं दैवी सौंदर्य आहे असा त्यांचा विश्वास आहे. एक लहानसें गवतावरचें पुष्प, पण त्याबद्दल त्यांचा जिव्हाळा, त्या फुलाच्या सौंदर्याचें त्यांनीं केलेलें कौतुक येथे किती हळुवार पण नादमधुर शब्दांनी ते सांगतात हें पाहा. कवितेंत त्यांच्या कल्पनाविलासाचें वैभवहि उपमा-उत्प्रेक्षांतून ओसंडतांना आढळेल. ]

मनोवेधका सृष्टिसतीच्या अगा चिमुकल्या बाळा !
स्वागत तव, ये तृणासहित या भूतें डोलविण्याला. १
सजल नील घन करोनि गेले अमृताचा वर्षाव;
चलत्तृणावरि तुला पाठवी प्रेमभरें मग देव. २
खेळ लाडक्या या सृष्टीच्या अंकावरती आता;
घे आंदोलन सुखें ताल दे या विहगांच्या गीतां. ३
या वायूच्या प्रशान्त लहरी, हे गगनाचे श्वास,
या प्रेमाच्या लाटा सुमना, चुंबुनि घे तूं यांस. ४
म्हणोत कोणी तूं अवनीच्या उदरांतुनि आलास;
मज गमसी परी नभोविहारी देवदूत तूं खास. ५
ही मोहकता, तुझी फुला ही प्रेमनिर्भरा वृत्ती;
सदानंद हा उद्‌भवेल का या भूपृष्ठावरती. ६

सदैव सस्मित, सदैव अपुला डोलत तूं असतोस;
दुःखसृष्टी कधी स्पर्शली नाही तव चित्तास ७
तुला तुडविती कितेक करिती तुजवरती आघात;
म्हणोनि नाही कधी पाहिलें खिन्न तुझें मीं चित्त. ८
मैदानावर मी मित्रांसह या खेळाया येतों;
प्रतिवर्षी तुज बघतों येथे, सर्वेच वेडा होतों. ९
तुझीं चुंबनें असंख्य घेतों, धरितों तुज हृद्याशीं;
तृप्ति न हो परि चित्त धावतें पुनःपुन्हा तुजपाशी. १०
तृणपुष्पा चल, तुज कवितेच्या ठेविन उद्यानांत;
सख्या रहा तूं तिथे निरंतर, रंजव माझें चित्त. ११

बालकवींची समग्र कविता

**टीपा :--**

पुढील कल्पना तुम्हांस आवडतील.

अमृताचा वर्षाव, गगनाचे श्वास, प्रेमाच्या लाटा, नभोविहारी देवदूत.

**अभ्यास :--**

१. तृणपुष्पाच्या निर्मितीबद्दल लोकांच्या व कवींच्या काय कल्पना आहेत ? २. ' सदानंद हा उद्भवेल का या भूपृष्ठावरतीं ? ' असें कवीस कां वाटतें ? ३. ' तृणपुष्प सदैव सस्मित कां ' ? ४. कवीची तृणपुष्पाबद्दलची ओढ कशी प्रकट होते ? ५. बालकवींची ' तृणपुष्प ' व तांबे यांची ' तृणाचें पातें ' या कविता एकत्र वाचा व काय साम्य-विरोध आढळतो तो पाहा.

# ११. रातराणीच्या मृदु फुलांनो !

[ विषय-परिचय : रातराणी फुलली असतां रात्रीं तुम्ही तिच्या जवळून कधी गेलां आहांत काय? आसंमतांत दरवळलेला अतिशय मधुर असा सुवास तुमच्यापर्यंत येतो आणि तुमच्या सर्व वृत्ति अगदी बहरून टाकतो. त्या मधुर सुगंधाने मन अगदी प्रसन्न होतें आणि आपण क्षणभर अगदी भारून जातों. या मधुर सुगंधाने कवीची वृत्ति अशीच बहरून गेली आहे. दुसऱ्यांना असे मंत्रमुग्ध करण्याची कोणती कला त्यांच्या जीवनांत साठलेली आहे, याचा कवि विचार करूं लागला. अल्पकाल जीवन असूनसुद्धा दुसऱ्यांना अमृतजीवन देणाऱ्या या रातराणीच्या फुलांविषयी कवीला अत्यंत आकर्षण वाटूं लागलें व त्यांच्या सौहार्दासाठी तो तळमळूं लागला. रातराणींच्या फुलांविषयीच्या या सर्व भावना कवीने अत्यंत कोमल आणि मधुर शब्दांत व्यक्त केल्या आहेत. त्यांची भाषा व भावना जणू रातराणीच्या फुलांच्या माधुर्याने आणि कोमलतेने नटली आहे असें तुम्हांला कविता वाचतांना वाटेल. ]

[ मुक्त-छंद ]

रातराणीच्या मृदु फुलांनो !
दोन दिवसांचा तुमचा गंध,
अल्पकाळ तसा गोड सहवास,
पाहुनी, व्याकूळ हृदय होई !
सडा पडलेला भूमीवर किती—

दा. क्र. 6034

कोमेजून गेला ! !

अवसेनंतर,
चंद्रकला जेंव्हा वाढूं लागल्या,
चांदण्या रात्रीं,
डवरल्या या डहाळ्या कळ्यांनी,
घोस लोंबले फांदीफांदीवर,
पाकळीपाकळी उमलूं लागे,
जणू बालकें डोळे उघडतीं,
सायंचांदण्या एकेक नभीं वा दिसूं लागती,
तसें फुललें हळू हळू नव—
ऐश्वर्य तुमचें जीवनांतील !

हासत डोलत वाऱ्यावरती
पिऊनी चांदण्यांतलि अमृत,
तृप्त मनाने सोडीले सुगंधी—
तुम्ही निःश्वास !
धुंद करुनी मन भारलें—
वेधून मजला, जादूगार जसा—

मंत्र फेकूनी मुग्ध करी जन,
अनिमित्त हासें जशीं वेधितीं बालकें गोड;
मीहि श्वासांनी मिटल्या नेत्रीं पिऊनी जीवन,
अतृप्तपणें समाधानलों !

जीवनीं तुमच्या
कोणती साठली महान् कला ?

संगीताचे स्वर आळवितां कुणीं—
टिपले तुम्हीं,
आणि रागदारी मूक सुवासीं—
सोडिली वाऱ्याच्या लहरीवरती ?
नसानसांतून तरी भिनले—
तुमचे सुगंध उन्मादकारी ?

नृत्यकलेंतील छुमछुम् रुमझुम्,
अभिनयांतील कोमल कटाक्ष कंचनीच्या वा,
हळुवारपणे ओढून घेतले,
आणि खालीवर डोलवीत मान:—
चांदण्यांत ते निःश्वासीं टाकले—

अष्ट सात्विक रसेले भाव ?
प्रमदांच्या अन्तरंगांत शिरूनी
वेचिली तुम्हीं आर्त कोवळीक,
आणि उन्माद धुंदकारी, नव—
रसरसलेली, काव्यात्म वृत्ति,
तारुण्यांतील जीवनसंगीत—
उन्मेषून जी स्वप्नसंगिनी—
स्पर्शीते आपुल्या तानेमधूनी ?

जीवन तुमचें किती अल्पकाल !
पण चांदण्याचें अमृत जीवन—
सेवूनी शान्त,
अमृतजीवन देतां मजला;
आणि कोमेजूनी पुन्हा जन्मतां,
द्यायास अमृतजीवन आम्हां
परंपरेने !

जीवनांत मृत्यू येतां, हसतां;
मृत्यूंतून नवें जीवन घेऊनी,

हासतां, रमतां—
आणि रमवीतां !
म्हणून माझा व्याकूळतो जीव—
सौहार्दासाठी,
आणि बसती डहाळ्यावर, चांदण्यावर
डोळे खिळूनी माझे अधीर—
जवळिकेसाठी !

गिरीश
— " चंद्रलेखा "

अभ्यास :—

१. रातराणीचें हळूहळू फुलणारें ऐश्वर्य कवीने कसें वर्णन केलें आहे ? २. रातराणीच्या फुलांच्या सुगंधी निःश्वासांनी कवीची कशी स्थिति झाली ? ३. रातराणीच्या उन्मादकारी सुगंधावर कवीने कोणकोणत्या कल्पना केल्या आहेत ? ४. कवीचा जीव रातराणीच्या सौहार्दासाठी कां व्याकुळला आहे ?

• • •

# १२. दोन विभूति

नं. दि.

[ **विषय-परिचय :** महात्मा गांधी व रवीन्द्रनाथ टागोर या भारतांतील दोन अलौकिक विभूति. आपल्या गीताञ्जलीने रवीन्द्रांनी आपल्या कीर्तीची पताका साऱ्या विश्वांत फडकविली व पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशांना भारून टाकलें. महात्मा गांधींनी पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या देशाला सत्याग्रहाचा नवा मार्ग दाखवून दिला आणि स्वातंत्र्या-साठीं लढा देण्यास त्यांनी जनतेला प्रवृत्त केलें. अखिल जगाचें लक्ष या दोन विभूतींनी आपणांकडे वेधून घेतलें. या दोघांचें वर्णन माधव ज्यूलियन यांनी खालील कवितेंत कसें केलें आहे तें पाहा. ]

मी पाहूनि विभूति दोन नमलों त्यांच्यापुढे तत्क्षणीं—
येती थोर अजूनिही सुत असे या हिंदभूच्या कुशीं !
दोघेही गुरु-शुक्र, मित्रच म्हणा, दोघे विचाराग्रणी,
तो त्यागी कृश एक आणि दुसरा हा राजयोगी ऋषी.
दाढीदार सतेज शान्त वदनीं गांभीर्य हें प्रेमळ,
अंगीं नाजुक सैल रेशमि झगा, टोपी शिरीं मखमली,
त्याची क्षीण तपाळ मूर्ति, किति तद्हास्यीं महन्मंगल !
नेसे तो निजहातकांतिवसुती कौपीन जाडी भली.
हा गीताञ्जलिने दिगन्त पसरी हिंदी मनोवैभव,
इच्छी पश्चिमपूर्वयोग, निवडूं पाहे खरी संस्कृती,

तो सत्याग्रहशूर वीर पडला बंदींत सत्यास्तव,
अध्यापी नव राज्यनीति, पटवी स्वाङ्गें करूनी कृती.
हा ठाकूर रवीन्द्रनाथ मिरवे साहित्यसम्राट, पण
गांधी मोहनदास पाहि वळवूं दारिद्र्यनारायण.

माधव जूलियन
'तुटलेले दुवे'

**टीपा :—**

ही कविता शार्दूलविक्रीडित वृत्तांत लिहिली आहे, आणि हिच्या चौदा ओळी आहेत. पहिल्या बारा ओळींत महात्मा गांधी व रवींद्रनाथ टागोर यांचीं वर्णनें आलीं आहेत व शेवटच्या दोन ओळींत त्यांची योग्यता सांगून समारोप केला आहे. अशा काव्यप्रकाराला 'सुनीत' म्हणतात.

निजहातकांतिवसुती = आपल्या हाताने ज्याचें सूत कातलें आहे अशी.

**अभ्यास :—**

१. या सुनीतांत रवीन्द्रनाथ टागोरांचें कवीने कोणत्या शब्दांत वर्णन केलें आहे? २. महात्मा गांधींचें वर्णन कसें केलें आहे ३. त्या दोघांना कशाची उपमा दिली आहे? ४. रवीन्द्रनाथ टागोरांनी कोणतें कार्य केलें? ५. महात्मा गांधींचें कार्य कोणतें? ६. खालील ओळींचा अर्थ द्या: १. इच्छी पश्चिमपूर्वयोग... संस्कृती. २. अध्यापी नव राज्यनीति...कृती.

• • •

# १३. सरितेचें चरित्र

[ **विषय-परिचय :** यशवन्तांनी खालील कवितेंत नदीचें उदात्त चरित्र किती सुंदर रीतीने वर्णन केलें आहे ! चांदणें फुललेलें असो किंवा कडक उन्हाळा असो, कुणी आपणांत अस्थिविसर्जन करोत की कुणी गणपति-विसर्जन करोत, कुणी सोन्याची घागर घेऊन पाणी भरावयास येवो, कुणी पखाल घेऊन येवो, नदीला त्याबद्दल कधी खंत वाटत नाही की कधी हर्ष वाटत नाही. जग शोभिवंत करण्याचें व्रत घेऊन सागराच्या रोखाने तिचा प्रवास चालू असतो. हें सरितेचें चरित्र एखाद्या संताच्या चरित्राची आपणांला आठवण करून देत नाही काय ? ]

करिते का कधि खंत
सरिता करिते का कधि खंत ?
रांगत लोळत दौडत घोळत
कडेकपारींतुनी खळाळत
आक्रमिते निज पंथ ।। सरिता०
फुलो चांदणें, असों ग्रीष्मदिन
असो तमिस्रा ढगाळ भीषण
समान शिशिर वसंत ।। सरिता० ।।

कुणीं आणिली घागर मृण्मय
पखाल किंवा कलश हिरण्मय
पहावया न उसंत ॥ सरिता० ॥
करोत मज्जन रूपयौवना,
दुर्जन, सज्जन, जरठ, अंगना
असो रंक धनवन्त ॥ सरिता० ॥
करोत कोणी अस्थि-विसर्जन
ताबुत किंवा देव गजानन;
स्वागतशील उदन्त ॥ सरिता० ॥
मरुभूमींतुन दहनभूमिंतुन
गात चालली एकच गायन—
'करुं जग शोभावन्त !' ॥ सरिता० ॥
भेदभाव परि निर्मुनि; मानव
होई दानव; तरंगिणी लव—
गणी न हंस तरंत ॥ सरिता०
असें सन्तसम जीवित आखुन
आसमंत ही करीत पावन

वरिते सिंधु अनन्त
सरिता विश्रुत-चरित दिगन्त,
करिते का कधि खंत
सरिता करिते का कधि खंत ?

यशवन्त
' यशोनिधि '

टीपा :—

मृण्मय = मातीची. हिरण्मय = सोन्याची. उसंत = सवड. उदंत = शुद्ध अन्त.करणाची. तरंत = बेडूक. विश्रुतचरितदिगन्त = जिचें चरित्र दाही दिशांना प्रसिद्ध आहे अशी.

अभ्यास :—

१. नदीची समतावृत्ति कवीने कशी वर्णन केली आहे ? २. सरितेच्या तोंडीं गाणें कोणतें असतें ? त्या गाण्याप्रमाणे तिची कृति असते काय ? ३. तिच्या प्रवाहांत स्नान करावयास कोण कोण येतात ? त्यांना ती कशी वागविते ? ४. सरितेचें जीवन कुणाप्रमाणे आहे असें कवीला वाटतें ? कां ?

# १४. कवीचीं विरामचिह्नें

[ विषय-परिचय : गोविंदाग्रजांची ' विरामचिह्नें ' ही कविता तुम्हीं वाचलीत. आपल्या जीवनांत वेळोवेळीं कोणकोणतीं विरामचिह्नें येतात हें तुम्हीं पाहिलें. आता या कवितेंत केशवकुमारांनी कवींच्या जीवनांत विरामचिह्नें कुठेकुठे व कशींकशीं येतात हें मोठ्या विनोदी रीतीने दाखविलें आहे. त्यावर दिलेली टीपहि मोठी गंमतीची आहे. शेवटीं ' कोरस ' म्हणजे सर्वांनी म्हणावयाचा श्लोकहि त्यांच्या विनोद दृष्टीची साक्ष देतो. मात्र केवळ विनोदापलीकडे या कवितेकडे दुसऱ्या दृष्टीने पाहूं नका. अशा काव्यप्रकारास विडंबन असें म्हणतात. ]

[ मानवी जीवनलेखांतील गोविंदाग्रजांनी दर्शविलेल्या ' विरामचिन्हां' पेक्षा कवीच्या आयुष्यांतील ' विरामचिन्हें ' निराळीं असावींत ही गोष्ट हल्ली शुद्धलेखनासंबंधी चालू असलेल्या वादास धरूनच नाही काय ? ]

जेव्हा काव्य लिहावयास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जें जें दृष्टिंत ये तयावर ' करूं का काव्य ? ' वाटे मला,
तारा, चंद्र, फुलें, मुलें कितितरी वस्तू लिहाया पुढे,
तेव्हा ' स्वल्पविराम ' मात्र दिसती स्वच्छंद चोहीकडे !

झालें काव्य लिहून—यास कुठल्या धाडूं परी मासिका ?
यातें छापिल कोण ? लावुं वशिला कोठे ? कसा नेमका ?
रद्दीमाजि पडेल का ? परत वा साभार हें येइल ?
सारें लेखन तेधवा करितसें मी ' प्रश्नचिन्हा ' कुल !

अर्धांगीपुढती करून कविता नांवें तिच्या धाडिली,
अर्धें काम खलास होइल अशी साक्षी मनीं वाटली !
कैसा हा फसणार डाव ? कविता छापून तेंव्हाच ये !
केला ' अर्धविराम ' तेथ; गमलें तेथून हालूं नये !

झाली मासिकसृष्टि सर्व मजला कालान्तरें मोकळी,
केलें मीं मग काव्यगायन सुरू स्वच्छंद ज्या त्या स्थळीं !
माझें ' गायन ' ऐकतांच पळती तात्काळ श्रोतेजन !
त्या काळीं मग होतसे सहजची ' उद्गार ' वाची मन !

[ पुढील श्लोक ' कोरसा ' दाखल असून तो वाचकांनी कवीला ऐकूं न येईल अशा हलक्या स्वरांत गुणगुणावयाचा आहे. बाकी ऐकूं गेलें तरी काय व्हावयाचें आहे म्हणा ! ]

डेंग्यू, प्लेग, मलेरिया, ज्वर तसे अन् इन्फ्लुएंझा जरी
हीं एकेक समर्थ आज असतीं न्याया स्मशानान्तरीं—
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथे परी साधला,
देवा, ' पूर्णविराम ' त्या कविस या देशीं न कां आजला ?

केशवकुमार
' झेंडूचीं फुलें '

**अभ्यास :—**

१. कवीच्या जीवनांत निरनिराळीं विरामचिह्नें कुठेकुठे येतात ? २. गोविंदाग्रजांच्या ' विरामचिह्नां ' शीं या कवितेची तुलना करून या कवितेंतील विनोद स्थळें दाखवा. ३. ' पूर्णविराम ' कुणाच्या तोंडीं घातला आहे ? कां ?

# १५. जीवनानंद

[ विषय-परिचय : पेरीना भरूचा आणि चमनलाल धवान यांनी आपल्या विवाहाला घरांतील माणसांकडून विरोध झाल्यामुळे नागपूर येथील तेलंगखेडी तलावांत एकत्र आत्महत्या केली. त्यावर कवि अनिल यांनी ' प्रेम आणि जीवन ' ही दीर्घ कविता लिहिली. त्यांतील हा एक भाग आहे. जीवनांत किती आनंद भरलेला आहे हें त्यांनी निरनिराळीं उदाहरणें घेऊन मोठ्या सुंदर रीतीने पटवून दिलें आहे. 'जगतांतच जीवन आहे, जीवनांतच आहे आनंद ' हें या कवितेचें मुख्य सूत्र. त्याचा विकास खालील ओळींत कसा केला आहे तें पाहा. ]

साऱ्यांतच आहे जीवनानंद
तसा इतरत्र कोठेही नाही !

कां रे कंटाळलां जगतास या
प्रकाश पहिला जेथे पाहिला
जेथे रांगलां, दुडदुडलां
आणि वाढलां
जेथील सौंदर्य आणि आकाश
पाहून हृदयविकास झाला
प्रेमसुख जेथे तुम्हां मिळालें ?
असेल जगांत बरें वाईट
म्हणत मी नाहीं सारें चांगलें
बरें तें वाढवा, वाईट घालवा
पण जगांतच योग्य राहाणें

जगतांतच जीवन आहे; जीवनांतच आहे आनंद
येथे जगांतच जीवनानंद !

पाहा बरें जरा, चारी बाजूला
जीवनार्थ धडपड चालली
निव्वळ जीवन आनंद वाटे
असे आहेत किती जगतीं ?
उत्तर ध्रुवाच्या प्रदेशीं पाहा
अर्ध्या वर्षाची रात्र असते
काळ्याकुट्ट त्या अंधारांतच
हिमवर्षाव !
चराचरहि गोठून जातें
वाहातो तशाच तुफानवारा
नाहीं निवारा
पिके न कांही
तेथेहि नांदती मनुष्यप्राणी
—आणखी, सुखाने !
इतुका आनंद जीवनीं आहे !

दूर कशाला ? उभे राहा जरा
पुतळीघराच्या मोठ्या दाराशी
जेव्हा सुट्टी होते, तेव्हा नीट पाहा।

एकेक कशीं माणसें येतीं
थकली भागली पाहा ती बाई
दहा तास पुरे काम करुनी
बाहेर येते खिन्न मुखाने
खिन्नतेंत आहे मुग्धपणें त्या
मळूल 'चेहऱ्यावरती हासें
तिच्या घरीं आहे बाळ तान्हुलें
भेटेल आता घरीं जातांच
उल्हास तोच चमके मुखीं
त्याच्यासाठीच कष्ट करतां
कष्टांदु:खांतच जीव धरतां
जीवनाचा हेतु तिजसी आहे
अशा कष्टांतही जगतसे ती
जणू निश्चयेंच सुखी होण्याच्या
इतुक्या विरुद्ध परिस्थितींत
आपुल्या जीवास फार जपते
इतुका आनंद जीवनीं आहे !
लहानसें तें फुलपांखरूं
पडून राहातें कोशामध्येच
अंधारांतच जीव कंठितें, कष्ट भोगतें

वाट पाहात सान पंखाची
इतुका आनंद जीवनीं आहे !

कसा वसंताच्या वावटळींत
शुष्क वाळला पालापाचोळा
नाचतो, फिरतो, गिरगिरतो
प्रेमफुगडीचे फेर धरतो
उंच उंच जातां डोलूं लागतो
इतुकें जीवन प्रेमांत आहे !
इतुका आनंद जीवनीं आहे ! !

अनिल
'पेर्ते व्हा'

**टीपा :—**

पुतळीघर = सूत कातण्याची गिरणी.

**अभ्यास :—**

१. जीवनांत खरा आनंद आहे हें दाखविण्यासाठी कवीने कोणतीं उदाहरणें घेतलीं आहेत ? २. त्यांतील कोणतें उदाहरण तुम्हांला अधिक आवडलें ? कां ? ३. पुतळीघरच्या थकल्याभागल्या जीवनांत कोणता आनंद आहे ?

● ● ●

# १६. दोन देवभक्त

[ **विषय-परिचय :** आपल्या सामाजिक जीवनांत फार पुरातन कालापासून देवाची कल्पना रूढ आहे व तिला महत्त्वहि आहे. नवमतवादामुळे आपल्या सामाजिक जीवनांतील अनेक संकेत जसे उध्वस्त झाले त्याचप्रमाणे देवाविषयीचे संकेतहि बदलण्याची वेळ आली आहे. केशवसुतांनी विसाव्या शतकाच्या ऐन आरंभकाळांत ' देव दानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवूं द्या ' असे जे प्रक्षोभक उद्गार काढले होते, त्याच्या पुढची पायरी आता कवीच्या कवितेंत आढळत आहे. एकच देव—पण त्याच्याबद्दल दोन भिन्न प्रकृतीच्या व समाजाच्या थरांतल्या लोकांचे विचार कसे आहेत हे येथे वाचा. यांत आपल्या समाजजीवनांतील विषमता व दंभ यांवर कशी टीका झाली आहे तेंहि तुमच्या ध्यानांत येईल. ]

होतीं चार धुराडिं ओकत ढगें काळ्या धुराचीं जिथे
संपाग्नी भडकून ना चिलिमही सोडी धुरातें तिथे !
तेव्हा मालकही मनीं गिरणिचा झाला बहू रंजित;
सारें एकवटून चित्त मग तो देवा वसे प्रार्थित.
" केली दोन कलाक रोज बसुनी पूजा तुझी भक्तिने.
वस्त्रें घालुनि मखमली, किति तुला मीं घातले दागिने !
होता वृद्ध मदीय राख तिजला देतों जरी टाकुनी,
नाही का तव मंदिरें दिधलिं मीं नावें तिच्या बांधुनी ?
होत्या चार स्वयंगती परि अता मीं ठेविल्या दोन ना !
माझे हाल कसे तुझ्या बघवती देवा, खुल्या लोचनां ?

आता कांहि तरी असें कर जयें मालास या भाव ये
टक्के आठ करूनि काट मजुरी, बांधीन रुग्णालयें. ''

● ● ●

होता त्याच क्षणीं कुणी मजुरही देवाकडे पाहत
डोळे लाल करूनि, मूठ वळुनी मूर्तीस त्या सांगत.
'' तेथे त्या बघ गोधडींत पडलें अन्नाविणे कुंथत,
माझें बाळ तयास ना मिळतसे रे, खावयाला शित !
वाहोनी तुजला फुलें फुकटचा पैसा हरूं गांठचा;
गाड्या दोन मजेंत तो उडवितो आहे धनी आमुचा !
आकाशांतिल पोलिसा ! छळिसी कां दीनांस आम्हां बरें
देतों टाकुनि मूर्ति ही गिरणिच्या काळ्या धुराड्यांत रे ! ''

अनंत काणेकर
' चांदरात '

टीपा :—

राख = वेश्या. स्वयंगती = मोटार गाडी.

अभ्यास :—

१. गिरणीचा मालक रंजीस कां आला ? त्याने देवाची काय प्रार्थना केली ? देवासाठी त्याने काय केलें ? २. मजूर रंजीस कां आला ? त्याने देवास काय म्हटलें ? देवाची स्थापना कुठे व्हावी असें त्याला वाटतें ? ३. या कवितेंतील दोन विरोधी चित्रें स्पष्ट करा व या कवितेस ' दोन देवभक्त ' हें नांव क दिलें तें सांगा.

● ● ●

# १७. आला आषाढ–श्रावण

[ विषय–परिचय : आषाढ व श्रावण हे महिने मोठ्या आनंदाचे आणि उल्हासाचे. सृष्टीने याच महिन्यांत मोठें प्रसन्न रूप धारण केलेलें असतें. ऊन–पावसाच्या पाठशिवणीच्या खेळामुळे आणि जमिनीवर डोळे वळतील तिकडे दिसणाऱ्या हिरण्यागार गर्द हिरवळीमुळे डोळ्याचें पारणें फिटल्यासारखें वाटतें. निसर्गाच्या ह्या स्वरूपाने आजपर्यंत कितीतरी कवींना वेड लावलें आहे. ' श्रावण मासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिकडे ' असें श्रावण महिन्याचें गहिरें वर्णन बालकवींनी 'श्रावणमास' या कवितेंत केलें आहे. या संग्रहांतील ' वर्षा ' ही प्रा. निकुंब यांची कविताहि याच विषयावर आहे. श्री. मर्ढेकर यांनी केलेलें ' आषाढ–श्रावणा 'च्या सौंदर्याचें वर्णन अगदी निराळें असें वाटेल. यांत येणारीं दृश्यें तींच आहेत–पण त्या दृश्यांचें वर्णन करण्याची पद्धति मात्र नावीन्यपूर्ण वाटेल. ]

आला आषाढ-श्रावण
आल्या पावसाच्या सरी
किति चातक–चोचींने
प्यावा वर्षाऋतू तरी !

काळ्या ढेकळांच्या गेला
गंध भरून कळ्यांत;

काळ्या डांबरी रस्त्याचा
झाला निर्मळ निवान्त

चाळीचाळींतून चिंब
ओलीं चिरगुटें झालीं;

ओल्या कौलारकौलारीं
मेघ डुंगतात लाली

ओल्या पानांतल्या रेषा
वाचतात ओले पक्षी;

आणि पोपटी रंगाची
रान दाखवितें नक्षी

ओशाळला येथे यम
वीज ओशाळली थोडी;

धावणाऱ्या क्षणालाही
आली ओलसर गोडी

मनीं तापलेल्या तारा
जरा निवतात संथ;

येता आषाढ—श्रावण
निवतात दिशा—पंथ

आला आषाढ—श्रावण
आल्या पावसाच्या सरी;
किती चातक—चोचीने
प्यावा वर्षाऋतू तरी !

ब. सी. मर्ढेकर

टीपा :--

चातक पक्षी = हा संस्कृत कवितेंत येणारा काल्पनिक पक्षी आहे. मेघांतून पडणारें जल प्राशन करून तो आपली तहान भागवितो अशी कवि-कल्पना आहे.

अभ्यास :--

१. 'आषाढ-श्रावण' आल्यावर कवीला काय करावेसें वाटतें ? २. श्रावण महिन्यांतील कोणकोणत्या दृश्यांचें कवीने वर्णन केलें आहे ? तें कसें केलें आहे ? ३. खालील ओळींतील कल्पना स्पष्ट कराः- (अ) धावणाऱ्या क्षणालाही......गोडी (ब) मनीं तापलेल्या तारा......संथ. (क) ओशाळला येथे यम......थोडी.

# १८. आमचें निशाण

[ **विषय-परिचय :** खालील कवितेंत श्री. बोरकर यांनी स्वतंत्र भारताच्या निशाणाचें वर्णन केलें आहे. आपल्या देशाच्या ध्वजा-बद्दलचा अभिमान हें स्वदेशाभिमानाचें पहिलें लक्षण आहे. त्या ध्वजाच्या रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने आपले प्राण पणास लावले पाहिजेत, शस्त्रास्त्रांचा मारा सहन केला पाहिजे आणि ज्या तत्त्वासाठी तो ध्वज उभारला जात असेल त्या तत्त्वाचें प्राणपणाने पालन केलें पाहिजे. भारताचें निशाण समतेचें आणि विश्वशांतीचें आहे. त्या तत्त्वा-वर निष्ठा हाच आपल्या निशाणाचा खरा मान. तो राखण्यासाठी कोटि मुखांनी भारताचा जयजयकार करीत आकाशांत आपलें निशाण उंच फडकत ठेवलें पाहिजे. याच भावना श्री. बोरकरांनी किती परिणाम-कारक शब्दांत व्यक्त केल्या आहेत तें पाहा. ]

चढवूं गगनिं निशाण । आमुचें
चढवूं गगनिं निशाण ।
कोटि मुखांनी गर्जूं जयजय स्वतंत्र हिंदुस्तान ॥ ध्रु० ॥

निशाण अमुचें मनःक्रान्तिचें
समतेचें अन् विश्वशांतिचें
स्वस्तिचिन्ह हें युगायुगांचें हर्षिमुख-तेज महान् ॥ १ ॥

मूठ न सोडूं जरि तुटला कर
गाऊं फासहि आवळला जर
ठेवूं निर्भय ताठ मान ही झालें जरि शिर्काण ॥ २ ॥

साहूं शस्त्रास्त्रांचा पाउस
आम्ही प्रल्हादाचे वारस
सत्य विदारक आणूं भूवर दुभंगून पाषाण ॥ ३ ॥
विराटशक्ती आम्ही वामन
वाण आमुचें दलितोद्धारण
नमवूं बळिचा किरीट उद्धट ठेवुनि पादत्राण ॥ ४ ॥
हिमालयासम अमुचा नेता
अजातशत्रू आत्मविजेता
नामें त्याच्या मृत्युंजय हें चढवूं वरति निशाण ॥ ५ ॥

वा. भ. बोरकर
'दूधसागर'

**टीपा :—**

स्वस्तिचिह्न = कल्याणकारक चिह्न. हृषि – मुख–तेज = हसऱ्या प्रसन्न मुखाचें तेज. शिर्कोण = शिरच्छेद. दलितोद्धारण = दलितांचा उद्धार. वामन = विष्णूचा पांचवा अवतार. या अवतारांत बळी नांवाच्या राक्षसाच्या मस्तकावर पाय ठेवून त्याला त्याने पातळांत लोटलें होतें. अमुचा नेता = महात्मा गांधी. अजातशत्रु = शत्रु नसलेला. मृत्युंजय = मृत्यूवर विजय मिळविणारें.

**अभ्यास :—**

१. आपल्या निशाणाचें श्री. बोरकर यांनी कोणत्या शब्दांत वर्णन केलें आहे ? त्या शब्दांचा अर्थ काय ? २. निशाणाचें रक्षण कसें करूं असें बोरकर म्हणतात ? ३. चवथ्या कडव्यांत कोणती पौराणिक कथा आली आहे ? ती या संदर्भांत कशी लागूं पडते ? ४. आपल्या नेत्याचें वर्णन श्री. बोरकर यांनी कसें केलें आहे ?

• • •

# १९. मानव

[ विषय-परिचय : 'मानवा'च्या मोठेपणावर आजपर्यंत पुष्कळ कविता लिहिल्या गेल्या. केशवसुतांनी आपल्या 'स्फूर्ति' या कवितेंत

" अडवतील जरि देव तरी
झुंजूं त्यांच्याशीं निकरी
हार न जाऊं रतीभरी
"देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवूं द्या"

असा तेजस्वी विचार प्रगट केला आहे. कुसुमाग्रजांचीसुद्धा मानवाच्या सामर्थ्यावर असीम निष्ठा आहे व ती त्यांच्या अनेक कवितांतून व्यक्त झाली आहे. याहि कवितेंत देवांना बाहू उभारून आव्हान देणाऱ्या मानवाचें चित्र आपणाला आढळेल. देवाजवळ स्वतंत्रता मागण्यास गेलेल्या या मानवाचा आशावाद जबर आहे, स्वतःच्या सामर्थ्यावर व स्वार्थत्यागावर त्याचा विश्वास आहे व विजयाबद्दलची त्याला खात्री पण आहे. आपल्या आईच्या दास्याविमोचनार्थ अमृतकुंभाची मागणी करावयास गेलेल्या गरुडाचा आजचा हा मानव वंशज आहे. या कवितेंतील भाषाहि भावनेला शोभेल अशीच जळजळीत व ओजस्वी आहे. तुम्हांला ही कविता खास आवडेल. ]

स्वर्गामधल्या हे गर्वोद्धत देवदैवतांनो
दयेचें आज नको दान
पृथ्वीवरला मानव मी हा उभारुनी बाहू
तुम्हांला देतों आव्हान !

युगायुगांचा प्रवास केला गहन तमांतुन मीं
साहुनि दास्य शिरावरती
जाचत होते, जखडत होते, लोहबंध पायीं
परंतू मशाल ही हातीं
या दीप्तीने शिंपित शोधित अंधारीं वाटा
भरोनी तमामधे तेज
वशीवरती पाय रोवुनी स्वर्गाच्या देखा
ठाकलों उभा असें आज
मनगटांत या आज उदेलीं अजिंक्य सामर्थ्यें
तुटोनी तळीं पडे लोह.
देवांच्या दास्याची सरली आज काळरात
निमाले लज्जास्पद मोह
धरतीचा मी पुत्र पुकारी स्वर्गाच्या द्वारीं
माझ्या मातेची महती
हिरावलेली परत मागतों स्वतंत्रता माझी
माझिच, माझिच जी होती !

स्वर्गनदीच्या धवल जलावर अथवा अमरांचें
विलासी रक्त तरंगेल
स्वप्नासम हीं रम्य मंदिरें अग्नीच्या उदरीं
पडोनी अशेष होतील.
पडतिल मातीमधे रिकामे रत्नांचे पेले
चुरोनी किरीट असहाय
तुडवित जातिल चंदनचर्चित उरें अप्सरांचीं
पुढे हे चिखलांचे पाय
मेघगर्जनेंतून दवंडी माझ्या मुक्तीची
झडूं द्या अथवा विश्वाला
तडितेच्या अक्षरांत फिरवा नभामधे द्वाही
'मानव स्वतंत्र हा झाला.'

कुसुमाग्रज

अभ्यास :—

१. मानव आजपर्यंत कोणत्या प्रकारच्या दास्यांत होता? या दास्यांतून सुटण्यासाठी तो कुणाला आव्हान देत आहे? २. मानवाला स्वातंत्र्य मिळालें नाहीं तर काय होईल असें तो म्हणत आहे? ३. मानवाच्या सामर्थ्याची कल्पना कोणत्या ओळींतून व्यक्त झाली आहे?

## २०. माझा सुधीर

[ **विषय-परिचय** : आपल्या आईला आपल्या मुलाविषयीं अतिशय प्रेम व अभिमान वाटत असतो. तो कसाहि असला तरी तिला तो सौंदर्याचा पुतळा वाटतो, गुणाची खाण वाटतो. आईचें प्रेम असें विलक्षण असतें. ‘ माझा सुधीर ’ या कवितेंत पद्मा गोळे यांनी अशाच आईच्या हृदयाचें वर्णन केलें आहे. तिचा सुधीर सावळा म्हणून इतर लोक तिला हिणवत होते--पण. तिला तो कसा वाटतो हें पुढील कवितेंत वाचा. ]

माझा सुधीर सावळा
हिणविती जन वाचा
आणि दाखविती मज
कोणी दिमाख कशाचा

नील नीतळ आकाश
शुभ्र रंगही हंसाचा
तुझ्या अंगकांतीपुढे
काय दिमाख तयांचा ?

अत्तरांचा परिमल
आणि सुगंध फुलांचा
तुझ्या केशगंधापुढे
काय दिमाख तयांचा ?

पाखरांचीं मऊ पिसें
स्पर्श मृदुल सशाचा
तुझ्या जावळापुढती
काय दिमाख तयांचा ?

छटा पूर्वेची आरुणी
तसा रंग गुलाबांचा
तुझ्या कपोलापुढती
काय दिमाख तयांचा ?

डोळे काळे हरीणाचे
डौल कमल-दलांचा
तुझ्या नयनांपुढती
काय दिमाख तयांचा ?

चांदण्यांचा रे आल्हाद
सडा हिऱ्यामाणकांचा
तुझ्या मुक्त हास्यापुढे
काय दिमाख तयांचा ?

साखरेची मधुरता
मोह साखरझोपेचा
तुझ्या गोड पाप्यापुढे
काय दिमाख तयांचा ?

पद्मा गोळे

**अभ्यास :—**

(१) सुधीरपुढे कोणत्या कोणत्या गोष्टींचा दिमाख नाही असें आईला वाटतें ? (२) खालील ओळींतील कल्पना स्पष्ट करा :

डोळे काळे..............दिमाख तयांचा ॥
साखरेची मधुरता...... .....दिमाख तयांचा ॥

# २१. चिमुकलें डबकें

[ **विषय-परिचय :** केशवसुतांनी असें म्हटलें आहे की 'साध्याहि विषयांत आशय कधी मोठा किती आढळे' आणि हें वचन प्रस्तुत कवितेला फारच समर्पकपणें लागू पडतें. इंदिराबाईंनी कविता फारच थोड्या लिहिल्या हें खरें, पण ज्या लिहिल्या आहेत, त्यांत मात्र साध्या शब्दांतून मोठा अर्थ बाहेर काढण्याचें विलक्षण सामर्थ्य भरलेलें आहे. एक रस्त्याच्यामधे असलेलें उपेक्षणीय चिमुकलें डबकें तें काय ? पण त्याच्या वर्णनाच्या तपशिलावरोबर केवढा उदात्त विचार सहजगत्या कवयित्रीने सांगितला आहे तो शोधून काढा. ]

सरसर गेला पाउस येउनी
जिकडे तिकडे झालें पाणी
टप टप ठिबके पानामधुनी
लोट चालले रस्त्यामधुनी
लगबग जाती कुठे धावुनी
घाई कसली—कुठे ओढणी !

मध्येच रस्त्यावरी एकलें
साचुन राही डबकें इवलें
जणू खोडकर हट्टी बालक .
तटुनी हटुनी राही नाहक

रुचे न त्याला जाणें धावुन
आणिक मिळणें ओढ्यालागुन.

आस कोणती मनीं धरूनी
बसे इथे हें खिन्न होउनी
गढूळ झालें चिखल माखुनी
गजबज करती चिलटें वरुनी
कुणी पोरटीं जातां येतां
खडे फेकती त्यांत खेळतां
कुणी न जाई त्याच्या जवळुन
जातां घेती वस्त्र आवरून
तिरस्कारुनी त्याला बघती
शी शी म्हणुनी कुणी थुंकती

गर्वोद्धत कुणि मधेच मोटर
भेदुनि जाई त्याचें अंतर
कारंजीं चिखलाचीं उडतीं
शांत जलावर रंग तरंगती.

सर्व ताप हा घेई सोसुनी
खिन्नपणाने राही बसुनी

येउन वरुनी कोमल रविकर
उजळूं पाहे याचें अंतर
येउनि वायूलहरी शीतल
हसवूं पाहे उदास पल्वल
कुणी बालिका गोजिरवाणी
शुभ्र सोनुल्या नावा सोडुनी
त्याच्या संगें खेळूं पाहे
परी कुणाला मुळी न मोहे.

हास्यछटा मुळि दिसे न वदनीं
खिन्नपणानें राही बसुनी
स्थितप्रज्ञ हा मुनी कुणितरी
घोर तपातें इथे आचरी.

कडक-उन्हाच्या समयीं कोठुनि
श्वान तिथे ये जीव घेउनी
केविलवाणें लूतभरू तें
मरणाला जणुं सादच देतें !
अन्तकाळची तहान त्याची
शमली तेथे दोन जिभांची.

आणिक पल्वल क्षणिक उजळलें
जणू तपाचें सार्थक झालें
चमकुनि किंचित् रविच्या किरणीं
पहातां पहातां गेलें सुकुनी.

इंदिरा संत
' शेला '

**टीपा :—**

काव्यरचनेंतील ध्वन्यानुकारी भाषेकडे कवयित्रीचें लक्ष आहे हें पुढील उदाहरणांवरून दिसेल. सरसर पाउस, टपटप ठिबके, लगबग जाती, तटुनी हटुनी, इत्यादि. गर्वोद्धत = गर्वाने उद्धट; पल्वल = डबकें; स्थितप्रज्ञ = ज्याची बुद्धि सुखदुःखांतहि अचल राहते तो. लूतभरू = कुत्र्याला लूत हा रोग होतो, या रोगाने भरलेलें.

**अभ्यास :—**

१. चिमुकल्या डबक्याच्या चेष्टा कोणीं केल्या? कोणत्या? कां? २. डबक्यास ' स्थितप्रज्ञ हा मुनी ' असें कां म्हटलें आहे? ३. डबकें कोणतें तप करीत होतें? त्या तपाचें सार्थक झालें काय? ४. चिमुकल्या डबक्याचें मोठेपण कशांत आहे? ५. या कवितेंतील मध्यवर्ती विचार काय आहे व तो स्पष्ट होण्यासाठी कवयित्रीने काय योजना केली आहे?

• • •

# २२. वर्षा

[ विषय-परिचय : सर्व सामान्यपणें लोकांनी आणि कवींनी ऋतुराज म्हणून वसंतालाच मान दिला आहे. कवि निकुंब यांनी ही ठराविकतेची चाकोरी सोडून वर्षाऋतूचें महत्त्व सांगितलें आहे. नवें जीवन देणारा व पृथ्वीला 'सुजलां सुफलां सस्यशामलाम्' करणाऱ्या वर्षाऋतूचें वर्णन किती भावनोत्कटतेने पण रेखीव शब्दांतून कवीने केलें आहे तें येथे आढळेल. प्रस्तुत कविता ही मुक्तछंदांत आहे. ]

येई वर्षादेवी !
विजेचें नर्तन, मेघांचें गर्जन,
मृद्गंध, विशाल समृद्ध शेतें,
अमृतवर्षाव सांगातीं घेऊन
हिरवा आपुला शृंगार लेवून
येई वर्षादेवी !

"वसंत ! वसंत ! ऋतुराज ! श्रेष्ठ !"
म्हणत नाचलों
आजपर्यंत
आम्ही वेडे कवि
परंपरेचे अंधपूजक !
संकेतांचे बळी !
करून घेतली वंचना स्वतांची
जाणूनबुजून !

आणिक घडलें जनवंचनही
हातून आमुच्या !
हे वर्षादेवी !
आम्हीच कारण तुझ्या उपेक्षेला !
—गुन्हेगार आम्ही !
क्षमस्व ! क्षमस्व !
आजपर्यंत
कधीच नव्हतें ऐकलें काय ?
आम्हीं तें तुझें
जीवनदायी घनगर्जित ?
तरीहि आम्ही म्हणत राहिलों,
" कुहू....कुहू....कुहू....
कुहू....कुहू....कुहू....
पंचम गोड तो ! "

काळ्या मेघांवर आरूढ होऊन
मृगदेवाने
टाकिली जेधवा पहिली चूळ
नव्या अमृताची
—थरारून गेली ' गंधवती पृथ्वी

आणिक सोडिले
सहर्ष तियेने सुगंध निःश्वास
कृतकृत्यतेचे !
समाधानाचे !

कितिकदा तरी सेविला होता
आम्हीं तो सुगंध
—आगामी समृद्ध, तृप्त जीवनाचा
अग्रगामी दूत !

तरीहि गातच राहिलों गायनें
आम्ही वासंतिक पुष्पसंभाराचीं,
परिमळाचीं !

तुझें संजीवक
पाचूंचें वैभव
नित्य पाहूनहि
आम्हीं उभविलीं गुढ्यातोरणें
चैत्रपालवीचीं

आणि स्वप्राणाने
हर्षनाद केला :
" वसंत आला ! "

भरूनी जीवन आकाशपात्रांत
सहस्रधारांनी
आरंभिला तूं अभिषेक जेव्हा
प्रतिमेवरती वसुंधरेच्या—
तीर्थजलाने त्या
सरिता, ओहळ ओसंडूं लागले
विजयोर्मीपरी यौवनांतल्या !
दुर्दम्य, जिवंत, भव्य आकांक्षांचें
तसलें प्रतीक नित्य पाहूनहि
मोहिनी मात्र पडली आम्हां
संथ वासंतिक पुष्करिणींची !
जीवनदेवते !
जाणीव आज हो आमुच्या गुन्ह्याची
क्षमस्व ! क्षमस्व !
'वसंत, वसंत !' म्हणून तेव्हा
कलाविलासाचा केला वडिवार
'जीवन-कले'ची प्रतीति मात्र
तुझ्या रूपांतून लाभतें आज !
येथून आम्ही
सदैव पुजूं
तुझीच—तुझीच समृद्ध कूस !
उमजलें आता तूंच अन्नपूर्णा !

येई अन्नपूर्णे !
उदात्त भावांनी भरून गेलेल्या हृदयापरी
भरून येऊं दे आकाशाचा ऊर
मंथर, सजल मेघमालिकांनी
वरि पुरुषाच्या
दीप्त, उर्जस्वल जयध्वनीपरी कडाडूं दे वीज !
सर्वत्र .वर्षूं दे अमृताच्या धारा !
चौफेर सुटूं दे मातीचा सुवास
वाहूं दे जीवन नद्यांत दुथडी
भिडवीं क्षितिजा विनम्र शेतें
अनंत, सतेज, हिरव्या छटांनी
निववी डोळे !
जिकडे तिकडे
चोहीकडे फुलो
उदंड, अमूप समृद्धि केवळ !
होतांच समूर्त वरदान तुझें
गहींवर उरीं दाटून जन
तुजला आपुल्या
उत्स्फूर्त, कृतज्ञ, स्निग्ध भावनांनी
गौरवितील !

म्हणतील आणि कृतार्थतेने,
यथार्थतेने,
" वन्दे मातरम् !
सुजलां, सुफलां सस्यश्यामलाम् !
वन्दे मातरम् ! "

कृ. ब. निकुंब
'उर्मिला'

**टीपा :—**

मृद्गंध = मातीचा सुवास. मृगदेवाने टाकिली जेधवा पहिली चूळ = मृग नक्षत्रांतील पहिला पावसाचा शिडकावा. गंधवती = पृथ्वीस गंधवती म्हणतात, कारण पहिला पाऊस जमिनीवर पडला की जमिनींतून मोहक सुवास निघतो. परिमळ = सुगंध. पाचूंचें वैभव = पावसाळ्यांत दिसणारी हिरवळ. मंथर = संथ.

**अभ्यास :—**

१. वर्षादेवीला कोणत्या वस्तूंसह येण्यास कवि सांगत आहे ? २. कवीने वर्षाऋतूची क्षमा कां मागावी ? ३. मृगदेवाच्या चुळेला 'तृप्त जीवनाचा अग्रगामी दूत' कां म्हटलें आहे ? ४. वर्षाऋतूच्या अभिषेकाचें वर्णन स्पष्ट करा. ५. वर्षाऋतूंत जीवन-कला आहे असें कवीला कां वाटतें ? ६. खालील चरणांतील कल्पना स्पष्ट करा :— ( अ ) आम्ही वेडे कवि परंपरेचे अंधपूजक ! ( आ ) वसंत, वसंत म्हणून तेव्हा ...... लाभते आज ! ( इ ) उमजलें आता तूंच अन्नपूर्णा !

● ● ●

# २३. अहा ते सुंदर दिन हरपले !

[ **विषय-परिचय :** प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत कोणता ना कोणता तरी कालखंड अत्यंत सुखकारक असतो व त्या काळाची तो वारंवार आठवण काढतो. त्या सुखांची ही आठवण त्याला आनंद देते व कांही वेळीं बेचैनहि करते. शान्ता शेळके यांना कोणत्या काळाची व सुखांची आठवण येते तें तेथे वाचा. ही कविता वाचतांना कवयित्रीच्या भावपूर्णतेची, कल्पनाशक्तीची आणि नादमधुर शब्दांची तुम्हांस जाणीव होईल. ]

अहा ते सुंदर दिन हरपले !
मधुभावाचें वेड जयांनी जीवाला लाविलें !
दृष्टी होती मुग्ध निरागस
अंतर होतें प्रेमळ लालस
चराचरांतुन सौंदर्याचे किरण तदा फाकले !
शशिला होती अपूर्व सुषमा
आणि नभाला गहन नीलिमा
सुखोष्ण गमले प्रभातरविचे कर तेंव्हा कोवळे !
तृणपर्णांतुन, रानफुलांतुन
जललहरींतुन वा ताऱ्यांतुन
स्नेहलतेचें अद्भुत लेणें सहज तदा लाभलें !
मृदुल उमलत्या कलिका चुंबित
पुष्पदलांना उरिं कवटाळित—
संध्येचे मधुरंग बदलते हर्षभरें निरखिले !

अवनी गमली अद्‌भुत अभिनव
जिथे सुखाविण दुजा न संभव
घरिं वा दारीं वात्सल्याचे मळे नित्य बहरले !
आता नुरलें तें संमोहन
विषण्ण गमतें अवघें जीवन
बाल्य संपता आज जगाचें रूप सर्व बदललें !
अहा ते सुंदर दिन हरपले !

शान्ता शेळके

टीपा :—

निरागस = निष्पाप; चराचर = सजीव व निर्जीव; सुषमा = शोभा; संमोहन = मोहित होऊन जाण्याची क्रिया; विषण्ण = खिन्न.

अभ्यास :—

१. कोणते दिन हरपले असें कवयित्रीस वाटतें? हा कालखंड कोणता? २. या कालखंडांतील कोणतीं सुखें आता आढळत नाहीत? ३. सौंदर्य कोणकोणत्या गोष्टींत आढळतें? ४. पहिल्या कालखंडानंतर कोणता फरक जाणवतो? कां? ५. खालील चरणांतील कल्पना स्पष्ट करा:—(अ) स्नेहलतेचें अद्‌भुत लेणें सहज तदा लाभलें! (आ) घरिं वा दारीं वात्सल्याचे मळे नित्य बहरले!

# २४. शतकानंतर

[ विषय-परिचय : जवळ जवळ एका शतकाच्या पारतंत्र्याच्या निशेनंतर स्वातंत्र्याच्या आलेल्या पहिल्याच पहाटेचें स्वागत कोण करणार नाही ? दीर्घकालीन पारतंत्र्याच्या अंधारांतून स्वातंत्र्याच्या पहिल्याच प्रकाशाचा अनुभव मोठा सुखद असतो. नव्या जगांत आपण प्रवेश करीत असल्याची जाणीव आपणाला होते. पण त्याबरोबर स्वातंत्र्याची ही पहाट उगवावी म्हणून ज्यांनी ज्यांनी स्वार्थत्याग केला, आपल्या प्राणांचें बलिदान केलें, त्या हुतात्म्यांची आठवण या मंगल प्रसंगीं होणेंहि अपरिहार्य असतें. अशा विविध भावनांचें चित्रण प्रा. वसंत बापट यांनी १५ ऑगस्ट १९४७ च्या पहिल्या स्वातंत्र्य दिनावर लिहिलेल्या या कवितेंत आढळेल. ]

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट !
मेघ वितळले, गगन निवळलें
क्षितिजावर नव रंग उसळले
प्रतिबिंबित तें होउनि खुललें भारतभूमिललाट.
आजवरीच्या अंधारांत
अनंत झाले उल्कापात
एकवटोनी तेज तयांचें तिमिर सरें घनदाट.
फकिरांनी शत यज्ञ मांडले
वेदीवरती रक्त सांडलें
त्या रक्ताची क्षितिजावर ये आरुण मंगल लाट.

दीप पेटवुनि घरदारांचे
फूजन केलें स्वातंत्र्याचें
त्या ज्योतींचें तेज मिसळुनी झालें आज विराट.
पुरेत अश्रू दुबळें क्रंदन
भावपूर्ण करुं विनम्र वंदन
नव अरुणाचे होऊं आम्ही प्रतिभाशाली भाट.

वसंत बापट
' बिजली '

**टीपा :—**

भारतभूमिललाट = भारतभूमीचें कपाळ. उल्का = तारा. वेदी = यज्ञाचा ओटा.

**अभ्यास :—**

१. शतकानंतरच्या पहिल्या पहाटेचें कवीने कसें वर्णन केलें आहे ? २. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्यांनीं ज्यांनी प्रयत्न केले त्यांचें वर्णन कवीने या कवितेंत कसें केलें आहे ? त्यांच्या त्यागामुळेच आजचें स्वातंत्र्य मिळालें आहे हें कवीनें कुठे सूचित केलें आहे ? ३. कोणता नवा निश्चय या पहाटेला कवीने केला आहे ?

• • •

# २५. हात हवे मज

[ **विषय-परिचय :** आपणाला हात कसे हवेत याचें मोठें कल्पनारम्य चित्र श्री. पाडगांवकर यांनी या कवितेंत काढलें आहे. कवीला हात जुईच्या पुष्पाप्रमाणे नाजुक हवेतच—पण त्याबरोबरच ते नितान्त वत्सल हवेत, कणखर हवेत, सृजनशील हवेत आणि ख्रिस्ताप्रमाणे पवित्र पण कडाडणारेहि हवेत. कवीच्या या आकांक्षेंतून जीवनांतील सर्वच पवित्र, मंगल आणि सुंदर गोष्टीविषयी त्यांना वाटणारी आसक्ति त्यांत प्रगट होते. त्यांना केवळ सौंदर्य नको, केवळ कणखरपणा नको, केवळ कलासक्ति नको किंवा केवल पावित्र्य नको. जीवनाच्या या सर्वच अंगांचा प्रत्यय त्यांना हवा आहे. आणि हीच इच्छा त्यांनी खालील कवितेंत मोठ्या काव्यमय रीतीने प्रगट केली आहे. ]

हात हवे मज नाजुक सुंदर
जुइपुष्पांपरि ज्यांचें मार्दव
श्रावणांतल्या उन्हापरी अन् ज्यांचें लाघव !
स्पर्श जयांचा स्पर्शमण्यापरि
अवखळ चंचल जे लाटांपरि
दडलें ज्यांतुन
प्रमत्त यौवन
पुनवेच्या उत्फुल्ल रात्रिचें रजत निमंत्रण

हात हवे मज नितान्त वत्सल
क्षमाशील जे क्षमेहुनीही
पुण्यशील. जे गंगेहुनिही
जे मायेचा घास भरविती चिमण्या ओठीं
जे चुकलेल्या पांथस्थांना दीपच होती !
हात अन्नपूर्णेचे असले !
साफल्याचें अन् तृप्तीचें
ब्रीद जयांचें या धरणीपरि
सदैव ज्यांची वत्सल पाखर आकाशापरि !

हात हवे मज तसले कणखर
कर्मयोग साकार ज्यांमधे
जे मातीमधि बीज पेरिती
धगधगणाऱ्या उन्हांतही जे
नांगर धरिती, औत फिरविती !
खपती, श्रमती
जे यंत्रावर, जे घाण्यांवर,
हातोड्यांवर अन् मोटेवर

अन् जे घाणीच्या पाट्यांवर;
दिव्य उद्याच्या मानवतेचे शिल्पकार जे !

हात हवे मज तसले अद्भुत
सृजनशील जे दिव्य कलाधर !
जे ब्रह्म्याशीं स्पर्धा करिती;
चितारिती. जे
इंद्रधनूचें स्वप्न मुलायम !
छेडितात जे
पार्थिवतेंतुन गीत अपार्थिव !
स्पर्शें ज्यांच्या
शब्दांमधुनी
निःशब्दाचें गुपित उलगडे !
किमया ज्यांची
क्षुद्र असुंदर पाषाणांतुन
निराकार चिरसौंदर्याची घडवी मूर्ति !

हात हवे मज
ख्रिस्तापरि ते पवित्र तसले !

वर्षेहुनी जे दयार्द्र असुनि,
कडाडणारा करांत आसुड घेउनि येती
क्रुद्ध विजेपरि आणि उगारिति
त्यांच्यावरती, केला ज्यांनी
बाजारच मंदीर प्रभूचें,
विकिती जे वांधून खगांना,
मुक्त उडावें नभांत ज्यांनी !
विकिले ज्यांनी अपुले आत्मे
क्षुद्र आपुल्या स्वार्थासाठी !
हात हवे मज
असे शुभंकर अन् प्रलयंकर
शांतिरूप जे
ज्यांत जळे परि विराट संगर

हात हवे मज तसले मंगल:
मध्यरात्रिच्या प्रशान्त प्रहरीं
जग सारें निद्रित असतांना,
असतांना नभ नक्षत्रांकित

विभाग
नों. दि.

गिरि पद्मासनिं ध्यानावस्थित
चराचरान्चें मैत्र दाटुनी
सहजच जें प्रार्थनेंत स्फुरती !
जे चिर जागृत, जे करुणामय
आशीर्वादच मूर्तिमंत जे
उरले जे उपकारापुरते
हात हवे मज असले मंगल
पवित्र सुंदर !

मंगेश पाडगांवकर
' जिप्सी '

**टीपा :—**

लाघव = हलुवारपणा. रजत = चंदेरी मुलायम = मृदु, मऊ. शुभंकर = कल्याण करणारे. प्रलयंकर = प्रलय करणारे. संगर = युद्ध.

**अभ्यास :—**

१. कवीला वत्सल हात कशासाठी हवेत ? २. उद्याच्या मानवतेचे शिल्पकार कोण ? त्यांच्या हातांचे कवीने कसें वर्णन केलें आहे ? ३. कलावंताच्या हातून कसली कसली निर्मिति होते ? ४. ख्रिस्ताप्रमाणे हात हवेत असें कवीने कां म्हटलें आहे ? त्याचे हात कसे होते ? ५. शेवटच्या कडव्यांत कवीने कोणती इच्छा व्यक्त केली आहे ? ● ● ●

# कविपरिचय

( १ ) **ज्ञानेश्वर** ( १२७५ ते १२९६ ) : ' ज्ञानदेवें रचिला पाया ' असें बहिणाबाईने ज्याच्याविषयी गौरवाचे उद्गार काढले आहेत असा भागवत धर्माचा श्रेष्ठ प्रवर्तक, पण केवळ तत्त्वज्ञच नव्हे तर श्रेष्ठ कवि म्हणून त्याने गेलीं सातशें वर्षे मराठी मनावरील आपली मोहिनी कायम टिकविली आणि ' माझा मराठाचि बोलु कवतुकें । अमृतातें हि पैजा जिंकें । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन । ' ही आपली प्रतिज्ञा खरी करून दाखविली. ' ज्ञानेश्वरी ' हा त्यांचा प्रमुख ग्रंथ. विद्वत्ता, रसिकता, कल्पनाविलास इत्यादि सर्व गुणांचा संगम या ग्रंथांत झालेला आढळेल. याशिवाय अमृतानुभव–चांगदेवपासष्टी हीं प्रकरणें त्यांनी लिहिलीं व अभंगरचनाहि केली. त्यांचे हरिपाठाचे अभंग आज सर्व वारकऱ्यांच्या तोंडीं आहेत. वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी जिवंत समाधि घेतली.

( २ ) **मुक्ताबाई** ( १२७९ ते १२९७ ) : निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व सोपानदेव या तिघा भावांची मुक्ताबाई ही धाकटी बहीण. वयाने लहान असली तरी तिचा आध्यात्मिक क्षेत्रांतील अधिकार फार मोठा होता. जन्मतःच तिला वैराग्य प्राप्त झालें होतें. त्यामुळे विवाह करून ती संसारांत पडेल असा संभवच नव्हता. आपल्या भावांच्या पावलावर पाऊल टाकून तिने भक्तिमार्गाचा अवलंब केला. ईश्वरस्मरण, चिंतन व संकीर्तन याशिवाय सर्व आयुष्यांत तिने कांहीच केलें नाही. त्यामुळे चांगदेवांसारख्या वयोवृद्ध योग्यानेहि तिचें शिष्यत्व पतकरलें. कल्याणपत्रिका, हरिपाठ, नमन वगैरे प्रकरणें तिने लिहिलीं.

किरकोळ अभंगरचनाहि केली. पण 'ताटीचे अभंग' हेच तिचे महत्त्वाचे अभंग. जीवनाचें सर्व सार त्या सात अभंगांत आलेलें आहे. १२९७ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी तिने जलसमाधि घेतली.

( ३ ) **नामदेव** ( १२७० ते १३५० ) : ज्ञानेश्वरांच्या समकालीन श्रेष्ठ भक्त. लहानपणापासून त्याला विठ्ठलाचें वेड. वाणी अतिशय प्रेमळ व आकर्षक. त्याने रचलेले अभंग आजहि वारकऱ्यांत अतिशय लोकप्रिय आहेत. त्याचें नवनीताप्रमाणे कोमल हृदय त्याच्या प्रत्येक अभंगांतून प्रतिबिंबित झालेलें आढळतें. परमेश्वरभेटीची तळमळ, भक्तीचा जिव्हाळा व भावनेची आत्यंतिक मृदुता व कोमलता यांमुळे त्याचे अभंग अतिशय गोड वाटतात. ज्ञानेश्वरांचें चरित्रहि त्यांनी 'आदि', 'तीर्थावळी' व 'समाधि' या प्रकरणांतून वर्णिलें आहे. त्यांचें अत्यंत महत्त्वाचें कार्य म्हणजे भागवत धर्माचा त्यांनी पंजाबपर्यंत प्रचार केला.

( ४ ) **तुकाराम** ( १६०८ ते १६५० ) : 'तुका झालासे कळस' असें बहिणाबाईने ज्याचें यथार्थ वर्णन केलें आहे ते तुकाराम म्हणजे वारकऱ्यांच्या गळ्यांतील ताईत समजले जातात. तुकारामांइतकी आत्यंतिक लोकप्रियता फारच थोड्यांच्या वांट्याला आली असेल. विविध विषयांवर त्यांनी अभंगरचना केली; पण प्रत्येक अभंगांतून तुकारामांचें आकर्षक व्यक्तिमत्व प्रगट झाल्याचें आढळेल. सन्तांचें किंवा परमेश्वराचें वर्णन करतांना 'मेणाहुनि मऊ' झालेली त्यांची लेखणी ढोंगी साधूंवर व दंभावर प्रहार करतांना 'वज्रापेक्षाहि कठोर' झाल्याचें दिसेल. उत्कट ईश्वरभक्ति, सामान्य जनतेविषयीं वाटणारी कळकळ, जगाच्या व्यवहाराचें यथार्थ ज्ञान आणि समर्पक दृष्टान्त देण्याचें चातुर्य-यांमुळे त्यांचे अभंग महाराष्ट्रांत घरोघर आबालवृद्धांच्या मुखांत घोळत असतात. 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' ही त्यांच्या अभंगवाणीची मोरोपंतांनी केलेली स्तुति यथार्थ वाटते.

( ५ ) **मुक्तेश्वर** ( सुमारें १५९९ ते १६४९ ) : यांचें सबंध नांव मुक्तेश्वर चिंतामणि मुद्गल. प्रसिद्ध संतकवि एकनाथ यांचे ते नातू. अभिजात रसिकता, कल्पनाशक्ति व भाषाप्रभुत्व या गुणांमुळे त्यांचें काव्य रसिकांच्या आदरास पात्र झालें आहे. मुख्यतः महाभारतांतील 'आदि', 'सभा', 'वन', 'विराट'

व ‘ सौप्तिक ’ या पांच पर्वांचा त्यांनी मराठींत मोठ्या रसाळपणें अनुवाद केला आहे. निसर्गसौंदर्याचीं वर्णनें, युद्धाचीं वर्णनें वगैरे ठिकाणीं त्यांची प्रतिभा विशेष रमते. भव्य प्रसंगाचें वर्णन करतांना मुक्तेश्वराच्या प्रतिभेला एक प्रकारें स्फुरणच चढतें. ‘ मराठींतील पहिला ललित कवि ’ म्हणून कांहीं टीकाकारांनी त्यांचा गौरव केला आहे.

( ६ ) **सामराज** ( १५३० ते १६१० ) : शिवकालांतील एक प्रमुख पंडित कवि. हे अतिशय व्यासंगी व विद्वान् होते. संस्कृत महाकाव्याच्या धर्तीवर त्यांनी ‘ रुक्मिणीहरण ’ हें महाकाव्य रचलें. त्यांच्या प्रतिभेची विशालता, भाषाप्रभुत्व आणि वृत्तप्रभुत्व यांची साक्ष हें काव्य वाचतांना आपणांला पटते. कल्पनाप्रचुर व उत्तुंग वर्णनें हा या काव्याचा एक महत्त्वाचा विशेष आहे. या काव्याशिवाय त्यांनी ‘ मुद्गलाख्यान ’ या नांवाचें छोटें खंडकाव्यहि रचलें आहे.

( ७ ) **मोरोपंत** (१७२९ ते १७९४) : पेशवेकालांतील प्रमुख पंडित कवींपैकी एक कवि. बारामतीचे सरंजामदार बाबूजी नाइक यांचे हे आश्रित होते. पूर्व वयांत त्यांनी संस्कृतचें खोल अध्ययन केलें होतें. त्यांची ग्रंथसंपत्ति विपुल आहे. कुशलवाख्यान, श्रीकृष्णविजय, निरनिराळीं भक्तांचीं आख्यानें, सीतागीत, सावित्रीगीत व रुक्मिणीगीत हीं स्त्रीगीतें—ही सर्व त्यांची पूर्ववयांतील रचना. पण त्यांचा प्रमुख व रसिकमान्य ग्रंथ म्हणजे महाभारताचें त्यांनी ‘ आर्याभारत ’ या नांवाने केलेला रसाळ अनुवाद. शृंगार, करुण, वीर इत्यादि सर्व रसांचा आविष्कार यांत झालेला आढळेल. प्रसंगवर्णन, संवाद, स्वभावरेखन इत्यादि बाबतींत हा ग्रंथ अपूर्व गणला जातो. आर्यावृत्तावरील त्यांचें प्रभुत्वहि असामान्य आहे. यांशिवाय ज्यांत उत्कटतेने परमेश्वराची आळवणी केली आहे त्या त्यांच्या ‘ केका ’हि प्रसिद्ध आहेत.

● ● ●

( ८ ) **केशवसुत** ( कृष्णाजी केशव दामले : १८६६–१९०५ ) : आधुनिक मराठी कवितेचे प्रमुख प्रवर्तक. मराठी कवितेंत भावगीत, सुनीत इत्यादि अनेक नवे प्रवाह त्यांनी आणले. त्यांच्या काव्यापासून मराठी काव्यांत नवी सामाजिक दृष्टि येऊं लागली, निसर्गाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन येऊं लागला आणि आत्मलेखनहि येऊं लागलें. त्यांच्या वृत्तीला भावनाशीलतेप्रमाणे चिंतनशीलतेची जोड मिळाल्यामुळे त्यांचें काव्य जितकें आकर्षक तितकेंच प्रभावी वाटतें. काव्यग्रंथ : ‘ केशवसुतांची कविता ’.

(९) ना. वा. टिळक (रे. नारायण वामन टिळक : १८६१–१९१९) : केशवसुतांच्या समकालीन कवि व आधुनिक कवितेचे प्रमुख संवर्धक. कोमल भाषा व कोमल भावना हे त्यांच्या कवितेचे विशेष गुण. फुलांमुलांविषयी वाटणारें उत्कट प्रेम त्यांच्या अनेक काव्यांतून व्यक्त झाल्यामुळे त्यांना 'फुलांमुलांचे कवि' असेंहि म्हणतात. तत्त्वचिंतनशील वृत्तीमुळे त्यांच्या काव्यांतून अनेकदां बोध आलेला दिसतो. ईश्वरावरील विलक्षण श्रद्धा त्यांच्या अभंगांजलींतून प्रगट झालेली आढळेल. मुख्य काव्यग्रंथ 'टिळकांची कविता', 'अभंगांजलि' व 'ख्रिस्तायन'चा कांही भाग.

(१०) **गोविंदाग्रज** (राम गणेश गडकरी : १८८५–१९१९) : नाटककार, विनोदी लेखक आणि कवि या त्रिविध नात्यांनी साहित्यांत आघाडीवर असलेले कवि. 'केशवसुतांचा सच्चा चेला' असें ते आपणांस म्हणवून घेत असले तरी महाराष्ट्र त्यांना 'प्रेमाचे शाहीर' म्हणूनच ओळखतो. 'राजहंस माझा निजला', 'प्रेम आणि मरण', 'मुरली' इत्यादि त्यांच्या कविता विशेष प्रसिद्ध आहेत. कल्पनाविलास व भाषाप्रभुत्व हे त्यांच्या काव्याचे मुख्य गुण. काव्यग्रंथ : वाग्वैजयंती.

(११) **बालकवि** (त्र्यंबक बापूजी ठोमरे : १८९०–१९१८): निसर्गाचे गायक म्हणून प्रसिद्ध. त्यांच्याइतका सृष्टीशीं समरस होणारा दुसरा कवि मराठींत झाला नाही. नादमधुर शब्दरचना, भावनेचा आत्यंतिक हळुवारपणा व सृष्टिसौंदर्याशीं एकरूप होण्याची वृत्ति यांमुळे त्यांच्या निसर्गविषयक काव्यांना निराळेंच सौंदर्य प्राप्त झालें आहे. त्यांची 'फुलराणी' किंवा 'संध्यारजनी' आणि त्यांचा 'अरुण' किंवा 'बालनिर्झर' मराठी रसिक सहजासहजीं विसरणार नाही. काव्यग्रंथ : बालकवींची समग्र कविता.

(१२) **गिरीश** (शंकर केशव कानेटकर : जन्म १८९३). १९२० नंतर काव्यक्षेत्रांत गाजलेल्या रविकिरणमंडळाचे एक संस्थापक. विविध विषयांवर काव्यरचना. नादमधुर शब्दरचना आणि कोमल भावना हा त्यांच्या काव्याचा विशेष. सामाजिक विषयांवर 'अभागी कमल', 'आंबराई' आणि 'प्रभा' हीं खंडकाव्यें त्यांनी रचलीं. स्फुट कवितांचे संग्रह : 'कांचनगंगा', 'फलभार', 'मानसमेघ', 'चंद्रलेखा'.

(१३) **माधव जूलियन** (माधव त्रिंबक पटवर्धन : १८९४ ते १९३९ ) : रविकिरणमंडळाचे एक प्रमुख सदस्य व १९२० ते ४० च्या कालखंडांतले एक श्रेष्ठ कवि. नवीन वृत्तांचा व नवीन रचनेचा पुरस्कार यांनी हिरिरीने केला. उत्कट भावना, तरल कल्पना व ओजस्वी भाषाशैली या गुणांनी त्यांचें काव्य संपन्न आहे. स्फुट कविता व खंडकाव्य या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी अपूर्व यश मिळविलें. कवित्वशक्तीबरोबरच असामान्य विद्वत्ता हाहि त्यांच्या अष्टपैलु प्रतिभेचा एक विशेष. त्यांचे प्रमुख काव्यग्रंथ : 'सुधारक', 'विरहतरंग', 'तुटलेले दुवे', आणि 'नकुलालंकार' हीं खंडकाव्यें. 'गज्जलांजलि', 'स्वप्नरंजन' व 'मधुलहरी' हे स्फुट कवितांचे संग्रह. 'द्राक्षकन्या' हे उमर खय्यामच्या 'रुबायां'चें भाषांतर. यांशिवाय 'छंदोरचना' हा विद्वत्ताप्रचुर ग्रंथ.

(१४) **यशवंत** ( यशवंत दिनकर पेंढरकर : जन्म १८९९ ) : बडोद्याचे राजकवि म्हणून मान्यता पावलेले रविकिरणमंडळाचे एक प्रमुख सदस्य. १९२० नंतरच्या काळांतील अतिशय प्रतिभासंपन्न कवि. आपल्या भोवतालच्या जीवनांतील विविध प्रसंगांवर भावोत्कट रचना करण्यांत कुशल. त्यामुळे भावकवि म्हणून ते विशेष प्रसिद्ध. कल्पना व भावना यांचा त्यांच्या काव्यांत अतिशय मधुर संगम. प्रमुख काव्यग्रंथ : 'बंदीशाळा', 'जयमंगला' व 'काव्यकिरीट' हीं खंडकाव्यें व 'यशोधन', 'भावमंथन', 'यशोगंध', 'यशोनिधि', 'यशोगिरी' आणि 'ओजस्विनी' हे स्फुट काव्यांचे संग्रह.

(१५) **केशवकुमार** : ( प्रल्हाद केशव अत्रे : जन्म १८९८ ) नाटककार, विनोदी लेखक, कवि, पटकथालेखक इत्यादि अनेक नात्यांनी मराठी रसिकांना परिचित. विडंबन काव्याला लोकप्रियता यांनी मिळवून दिली. सुरुवातीला त्यांनी गंभीर कविता लिहिल्या. त्यानंतर विडंबन काव्याकडे ते वळले. विडंबनकाव्यास लागणारी रसिकता, मार्मिकता, विनोददृष्टि यांच्या काव्यांत भरपूर प्रमाणांत आढळते. प्रमुख काव्यग्रंथ : 'गीतगंगा' व 'झेंडूचीं फुलें'.

(१६) **अनिल** ( आत्माराम रावजी देशपांडे : जन्म १९०१ ) : मुक्तछंदाचे प्रमुख प्रवर्तक. विदर्भांतील अतिशय लोकप्रिय कवि. सुरुवातीच्या प्रेमाच्या गूढ भावना व्यक्त करणाऱ्या कविता 'फुलवात' या काव्यसंग्रहांत संग्रहित झाल्या

93.6.0 २५५१५५

आहेत. काव्याला गेयतेची जोड याच वेळीं दिली. नंतरच्या कवितांतून सामाजिक आशय अधिक प्रगट होऊं लागला. त्याचें परिणत स्वरूप 'पेर्ते व्हा' या काव्य-संग्रहांत आढळतें. 'भग्नमूर्ति' व 'निर्वासित चिनी मुलास' हीं भावना व विचार यांनी ओथंबलेलीं व मुक्तछंदांत लिहिलेलीं खंडकाव्यें विशेष प्रसिद्ध. स्फुट काव्यसंग्रह : 'फुलवात', 'पेर्ते व्हा.'

(१७) **अनंत काणेकर** ( जन्म १९०५ ): लघुकथा, लघुनिबंध, नाटक व काव्य या चारहि क्षेत्रांत विशेष प्रसिद्ध. प्रेमकाव्यें, विनोदी कविता, सामाजिक स्वरूपाच्या कविता अशा विविध विषयांवर त्यांनी काव्य लिहिलें आहे. प्रसादपूर्ण रचना व कल्पनारम्यता हे त्यांच्या काव्याचे विशेष गुण. प्रमुख काव्यग्रंथ : 'चांदरात'.

(१८) **बा. सी. मर्ढेकर** ( जन्म १९०९ ) : नवकाव्याचे प्रवर्तक. आजच्या मानवी जीवनांतील अशांति, अश्रद्धा आणि अगतिकता यांचें चित्रण नव्या प्रतीकांच्या व नव्या कल्पनांच्या साहाय्याने त्यांनी केलें. यंत्रयुगीन संस्कृतीचें भेसूर चित्र आपल्या काव्यांतून रंगविलें. अनेक वेळां क्लिष्ट शब्द व अपरिचित प्रतीकें यांमुळे त्यांची कविता दुर्बोध झाली आहे. 'बेकलायटी,' 'पंक्चरली' अशांसारखे शब्दहि त्यांच्या काव्यांत येतात. यंत्रयुगीन संस्कृतींत पिळून निघालेल्या दुबळ्या मानवाचें त्यांनी केलेलें चित्रण परिणामकारक आहे. प्रमुख काव्यग्रंथ : 'शिशिरागम', 'कांही कविता', 'आणखी कांही कविता'.

(१९) **बा. भ. बोरकर** (जन्म १९१० ): १९४० नंतरच्या काळांतील एक प्रतिभासंपन्न कवि. कल्पनेची तरलता, भावनांची कोमलता, भाषेंतील नादमाधुर्य हे त्यांच्या काव्याचे प्रमुख विशेष. निसर्गांतील सौंदर्याचा – विशेषत: गोमांतकांतील निसर्गसौंदर्याचा – प्रत्यय त्यांच्या अनेक काव्यांतून येतो. भावसौंदर्य व नादसौंदर्य यांचा मोहक मिलाफ त्यांच्या काव्यांतून आढळतो. त्यांच्या सश्रद्ध वृत्तीचें दर्शनहि अनेक कवनांतून होतें. प्रमुख काव्यग्रंथ : 'जीवन-संगीत', 'दूधसागर', 'आनंदभैरवी'.

(२०) **कुसुमाग्रज** ( विष्णु वामन शिरवाडकर : जन्म १९१२ ) : केशवसुतांप्रमाणे मानवतेचा पुरस्कार करणारे कवि. राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक विषमतेविरुद्ध बंड पुकारण्याची वृत्ति. त्यामुळे काव्यांत भावनांचा

आवेग विलक्षण. भव्य आणि विशाल कल्पनाशक्ति व ओजस्वी भाषाशैली हे त्यांच्या प्रतिभेचे विशेष. प्रमुख काव्यग्रंथ : 'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा'.

(२१) सौ. पद्मा गोळे ( जन्म १९१३ ) : आजच्या कवयित्रींत आपल्या प्रतिभेने व भावोत्कटतेमुळे विशेष प्रसिद्ध झालेली कवियित्री 'प्रीतिपथावर' हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह. पण त्यानंतरच्या त्यांच्या काव्यांत व्यापक सामाजिक दृष्टिकोन आलेला स्पष्ट दिसतो. त्यांचा नवा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

(२२) इंदिरा संत ( जन्म १९१४ ) : आपल्या भावोत्कट काव्यांनी विशेष प्रसिद्धीस आलेल्या आजच्या कवयित्री. 'सहवास' हा संत-पतिपत्नीचा संयुक्त काव्यसंग्रह. त्यांतील इंदिराबाईंचीं प्रेमगीतें मोठीं उत्कट आहेत. पतिनिधनानंतरची उदासीनता त्यांच्या नंतरच्या अनेक कवनांतून जाणवते. पण त्यांतहि त्यांनी विलक्षण संयम दाखविला आहे. तीं गीतें हृदयाला विलक्षण चुटपुट लावतात. पण या औदासीन्याच्या कोंडींतून त्या बाहेर येत असल्याचा प्रत्यय त्यांच्या आजच्या अनेक कवनांतून येतो. प्रमुख काव्यग्रंथ : 'सहवास', 'शेला'.

(२३) कृ. ब. निकुंब ( जन्म १९२० ) : आजच्या कवींत सोज्ज्वल भावनांनी आणि प्रसन्न भाषाशैलीने विशेष प्रसिद्धीस आलेले कवि. काव्यरचनेचे सारे प्रकार त्यांनी आत्मसात् केलेले आहेत. निवडक शब्दयोजना व रचनेची सफाई यांमुळे त्यांची कविता विशेष आकर्षक वाटते. प्रमुख काव्यग्रंथ : 'उज्ज्वला', 'उर्मिला'.

(२४) शांता शेळके ( जन्म १९२१ ) : कथा, कादंबरी व काव्य या तीनहि क्षेत्रांत विशेष सफाईने लेखन करणाऱ्या म्हणून जरी ह्या प्रसिद्ध असल्या तरी 'कवयित्री' म्हणून यांना मराठी रसिक अधिक ओळखतात. त्यांचें बहुतेक काव्य आत्मनिष्ठ आहे. स्वतःच्या जीवनांतील सुखदुःखांच्या भावना त्या मोठ्या उत्कटतेने रंगवितात. निसर्गाबद्दल त्यांना विलक्षण ओढ वाटते व ती त्यांच्या काव्यांतून ठिकठिकाणीं व्यक्त होते. त्यांच्या भाषाशैलींत त्यांच्या भावनेला साजेशी सहजता आहे. 'वर्षा' हा त्यांचा स्फुट कवितासंग्रह.

(२५) वसंत बापट ( जन्म १९२२ ) : नवोदित कवींत वसंत बापट

यांनी आपल्या ओजस्वी भाषेने व उत्कट भावनेने रसिकांचें लक्ष वेधून घेतलें आहे. त्यांच्या काव्यावर समाजवादी विचारसरणीची बरीच छाप पडलेली दिसते. त्यांच्या भाषेंत सहजता व आवेश या दोनहि गुणांचा आविष्कार होत असल्यांने त्यांतील भावना उत्कट रीतीने प्रगट होते. 'बिजली' हा त्यांचा काव्यसंग्रह.

(२६) **मंगेश पाडगांवकर** ( जन्म १९२९ ) : आजच्या तरुण कवींत मंगेश पाडगांवकरांनी रसिकांचें लक्ष अधिक आकृष्ट करून घेतलें आहे. त्यांची प्रतिभा स्वयंप्रकाशी आहे आणि त्यांचें कल्पनाविश्व स्वतंत्र आहे. सुरुवातीच्या काव्यांत कुसुमाग्रज आणि बोरकर यांच्या काव्याची छाप त्यांच्यावर पडली होती. पण 'जिप्सी' या त्यांच्या नव्या काव्यसंग्रहाने त्यांच्याविषयी बऱ्याच अपेक्षा निर्माण केल्या आहेत. जीवनाची त्यांना प्रचंड ओढ आहे. भावनेच्या आवेगांत ते जीवनाचीं गाणीं गातात व जीवनांतील भावसत्यें ओजस्वी भाषेंत प्रगट करतात. त्यांतच निसर्गसौंदर्याचीहि त्याला जोड मिळते. त्यांचे काव्यसंग्रह दोन – 'धारानृत्य', 'जिप्सी'.

REFBK-0008735
REFBK-0008735
अनुक्रम ९८७९.८
विभाग ८१०४
क्रमांक ७३४८
नों. दि. २४/८/५४
क्र. ८८३४